Library

किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक


३ ● मुक्तिशोध

४ ● 'मखमली क्रांती'च्या दिशेने इराण ?

६ ■ (अ) एक नजर इतिहासाकडे...

९ ■ (ब) मुक्तिपर्वाच्या प्रतीक्षेत....

१४ ● जागतिक 'अंमली' बाजार

२२ ● उद्योगांनी आरंभला 'उद्योग' प्रशिक्षणाचा

२४ ■ प्रशिक्षणाचे पथदर्शक 'बांधकाम'

२९ ■ प्रशिक्षणाचे युरोपीय 'मॉडेल'

३४ ● जिकडेतिकडे (अमेरिकी महाविद्यालयीन शिक्षणविश्व)


खंड ६ : अंक ५ ऑगस्ट २००७

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**
**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**
**वर्गणीसाठी पत्ता :**
**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ६ (अंक ५) ऑगस्ट २००७**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

### *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

### *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

### *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

> जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# मुक्तिशोध

"Revolutions are not made; they come. A revolution is as natural a growth as an oak. It comes out of the past. Its foundations are laid far back." - Wendell Phillips

जुन्या प्रथांच्या विरोधात उभ्या ठाकलेल्या वेण्डेल फिलिप्स या अमेरिकी वक्त्याने ८ जानेवारी १८५२ रोजी केलेल्या भाषणातील हे वाक्य इराणमधील आजच्या परिस्थितीचे वर्णन करण्यासाठी चपखल लागू पडते. आपल्या मूळच्या पर्शियन संस्कृतीच्या खाणाखुणा आजही अभिमानाने बाळगणाऱ्या इराणने, काळाच्या ओघात इस्लामचा (आणि विचारांच्या खुलेपणाचाही) अंगीकार केला होता. त्यामुळेच काळानुरूप बदलांचा विचार करण्याची मोकळीक बहाल करणारी इस्लाममधीलच 'इज्तिहाद' ही संकल्पनाही अठराव्या शतकाअखेरीस या देशाने मान्य केली होती. तेथील काही नेत्यांनीही सुधारणावादी भूमिका घेऊन समाजजीवनात काही बदल करण्याचा प्रयत्न केला. तरी, एकीकडे तेथे मूलतत्त्ववाद्यांचा जोर कायमच वाढता राहिला; तर दुसरीकडे, सुधारणावादी मनेही घडतच राहिली. त्यामुळे तेथे कायमच या दोघांमध्ये वैचारिक संघर्ष होत राहिला. १९७९ मध्ये झालेल्या 'इराणी क्रांती'नंतर तेथे मूलतत्त्ववाद्यांची सत्ता स्थापन झाली तरी त्यांच्यातही जहाल व मवाळ असे दोन गट कार्यरत होते. २००५मध्ये जहाल गटाच्या हाती सत्तासूत्रे आलेली असली तरी मवाळ गटही आपले अस्तित्व टिकवून आहे. 'इराणी क्रांती'च्या वेळी लोकशाहीकडे झुकणारा एक गटही तेथे अस्तित्वात आला होता. या गटाला कधीच सत्ता मिळाली नाही, तरी त्यांच्यातील विचारस्वातंत्र्याची ठिणगी कधी विझलीही नाही. नजीकच्या भविष्यात तेथे होऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये मवाळ गट आणि लोकशाहीवादी गट जर एकत्र आले तर या ठिणगीतून निपजणाऱ्या ज्वाळा त्या देशाला मूलतत्वावादी प्रवृत्तींपासून मुक्त करून लोकशाहीच्या शोधपथावर प्रकाशदान करू शकतील. जागतिक राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरू शकणाऱ्या या मुक्तिशोध पर्वाला 'अर्थबोधपत्रिके'त अग्रक्रम देण्यात आला आहे तो याचसाठी. ✿✿

# 'मखमली क्रांती'च्या दिशेने इराण ?

जगाच्या राजकारणात गेली अनेक वर्षे मुस्लिम राष्ट्रे या ना त्या कारणाने चर्चेत राहिली आहेत. युरोपीय समुदायात सहभागी होण्याच्या प्रयत्नांत असलेला पहिला धर्मनिरपेक्ष मुस्लिम देश तुर्कस्तान, तेलाच्या साठ्यात अग्रक्रमावर असणारा आणि ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर हल्ला करणाऱ्या अतिरेक्यांचा मायदेश असलेला सौदी अरेबिया, एकेकाळी सद्दाम हुसेनमुळे त्रस्त झालेला आणि आता अमेरिकेमुळे ग्रस्त झालेला इराक, तालिबानमुळे गांजलेला आणि गाजलेला अफगाणिस्तान तर गेल्या महिन्यात लाल मशिदीतील दहशतवाद्यांच्या विरोधात केलेल्या कारवाईमुळे प्रसिद्धीमाध्यमांच्या झोतात असलेला पाकिस्तान हे देश आंतरराष्ट्रीय राजकारणासमोर नवनवीन आव्हाने निर्माण करीत आहेत. यातच समावेश झालेला आणखी एक देश म्हणजे इराण. अण्वस्त्रनिर्मितीच्या मुद्यावरून अमेरिकेचा रोष पत्करलेला, 'इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण' हे नाव धारण करणारा आणि पुराणमतवादाकडे झुकणारा 'एक कट्टर मुस्लिम देश' अशी ओळख बनलेल्या इराणमध्ये अलीकडे काही घडामोडी घडत आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा दृष्टीने त्या महत्त्वाच्या ठरण्याची शक्यता आहे. १९७९मध्ये झालेल्या 'इराणी क्रांती'नंतर आता तेथे 'मखमली क्रांती'चे (Velvet Revolution) वारे वाहू लागल्याची चर्चा आहे.

अहिंसात्मक व शांततापूर्ण मार्गाने घडविलेली क्रांती म्हणजे 'मखमली क्रांती'! रक्त न सांडता न्याय्य मार्गाने आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी घडवून आणलेली ही वैचारिक क्रांती ! विशेषतः लोकशाही स्थापनेच्या दिशेने जाणारी ! जे विचारवंत व अभ्यासक समाजाच्या वाटचालीला 'मखमली क्रांती'ची दिशा देऊ शकतात, असे इराणी सरकारला वाटते, त्यांना सरकारचा रोष पत्करावा लागत आहे. यात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व लोकशाहीचे समर्थक डॉ. रामिन जहानबेगलू, वॉशिंग्टन येथील 'वुड्रो विल्सन इंटरनॅशनल सेंटर फॉर स्कॉलर्स'च्या संचालक डॉ. हालेह एसफांदियरी, कॅलिफोर्निया विद्यापीठातील 'सेंटर फॉर सिटिझन पीसबिल्डिंग'चे संस्थापक अली शाकेरी, न्यूयॉर्कमधील एक अभ्यासक कियान ताजबक्श, पत्रकार अकबर गांजी, पत्रकार पारनाझ अझिमा अशा काहींचा समावेश आहे. त्यांना इराणमधील राजकीय

कैद्यांसाठी असलेल्या तेहरानस्थित कुप्रसिद्ध अशा एविन तुरुंगात ठेवण्यात आले होते. राजकीय कैद्यांचा मानसिक व शारीरिक छळ या एविनमधील नित्याच्याच बाबी आहेत. गेल्या वर्षी अटक करण्यात आलेले जहानबेगलू व पत्रकार अकबर गांजी यांच्याखेरीज इतर कुणाचीही आतापर्यंत सुटका झालेली नाही. शांततेचा नोबेल पुरस्कार मिळविलेल्या इराणी वकील शिरीन इबादी यांनी डॉ. हालेह एसफांदियरी यांचे वकीलपत्र घेतले आहे. जगभरातील अनेक मान्यवरांनी या अभ्यासकांच्या अटकेचा निषेध केला आहे. मानवाधिकार संघटनांनीही या विषयात लक्ष घातले आहे. या अभ्यासकांनी खरोखरच 'मखमली क्रांती'च्या दिशेने काही पावले उचलली का, याबाबत स्पष्टता नाही. मात्र जहानबेगलू यांच्या सुटकेनंतरच्या निवेदनात त्यांनी याबाबत कबुलीजबाब दिला आहे. अर्थात तोही त्यांना राजकीय दबावामुळे व शारीरिक/मानसिक छळामुळे

## (तत्कालीन) चेकोस्लोव्हाकियातून आलेली 'मखमली क्रांती'

चेकोस्लोव्हाकिया (स्लोव्हाकिया वेगळा झाल्याने आता चेक रिपब्लिक) येथील साम्यवादी सरकारच्या विरोधात १६ नोव्हेंबर ते २९ डिसेंबर १९८९ या काळात झालेल्या शांततापूर्ण निदर्शनांचा उल्लेख 'मखमली क्रांती' (Velvet Revolution) असा केला गेला. काही अभ्यासकांच्या मते तत्कालीन चेकोस्लोव्हाकियातील नेते वाक्लेव्ह हावेल यांनी हा शब्दप्रयोग प्रथम उपयोगात आणला, तर काहींच्या मते कुणा पत्रकाराने त्याचा प्रथम उल्लेख केला. या क्रांतीनंतर तेथे लोकशाहीची स्थापना झाली आणि १९९०च्या जून महिन्यात प्रथमच लोकशाही पद्धतीने निवडणुका झाल्या. तत्कालीन सोव्हिएत युनियनमधील अनेक देशांमध्ये अशी 'मखमली क्रांती' झाली. पण त्यांची नावे मात्र वेगवेगळी होती. युक्रेनमध्ये याला Orange/Chestnut Revolution म्हटले गेले. याचे साधे कारण म्हणजे तेथे Chestnutची झाडे भरपूर आहेत आणि त्याची पाने हे तेथील राष्ट्रीय चिन्ह आहे. निदर्शकांनी प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधण्यासाठी नारिंगी रंगाचे झेंडे, टोप्या, रुमाल व कापडी फलक वापरल्याने Orange Revolution असेही याचे नामकरण झाले. जॉर्जिया येथील क्रांतीच्या वेळी हाती गुलाब घेऊन त्याला Rose Revolution असे म्हटले गेले. इस्टोनेशियातील क्रांती चक्क गाणारी - Singing Revolution होती, कारण तेथे क्रांतीच्या वेळी लोकगीते व इतर अनेक गाणी म्हटली गेली.

द्यावा लागल्याचे म्हटले जाते. इराणमधील संशोधक परदेशांमधील संशोधकांच्या सान्निध्यात राहून पश्चिमेकडील वारे इराणमध्ये आणू शकतात व इराणमध्ये 'मखमली क्रांती' घडवून आणण्यास साहाय्यभूत ठरू शकतात, असे इराणी सरकारला वाटते. या अभ्यासकांचे संशोधन विषय, पाश्चात्य देशांतील अभ्यासकांबरोबरचे त्यांचे संबंध, त्यांच्यातील चर्चा या साऱ्यांतून इराणी सरकारचा संशय बळकट होतो आहे. म्हणून त्यांच्या संशोधनात्मक स्वातंत्र्याचा संकोच करून त्यांची मुस्कटदाबी सरकारने केली आहे, असे म्हटले जाते. सुटका करण्यात आलेले डॉ, जहानबेगलू यांची कारकीर्द या 'मखमली क्रांती'वर प्रकाश टाकणारी आहे, असे दिसते. मात्र त्याकडे वळण्याआधी या संभाव्य (?) 'मखमली क्रांती'चा धसका इराणच्या सरकारने का घेतला आहे हे जाणून घेणे गरजेचे ठरते. म्हणूनच इराणच्या इतिहासाची पाने चाळणेही क्रमप्राप्त ठरते.

## (अ) एक नजर इतिहासाकडे...

प्राचीन काळापासून (ख्रिस्तपूर्व २७००) समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेला हा देश १९३५ पर्यंत 'पर्शिया' नावाने ओळखला जात होता. त्या नंतर तेथील सरकारने हा देश 'इराण' नावानेच ओळखला जावा, अशी विनंती आंतरराष्ट्रीय समुदायास केल्याने त्याचे 'इराण' असे नामांतर झाले. 'इराणी क्रांती'नंतर (१९७९) त्याचे अधिकृत नाव 'इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण' असे झाले.

खरे तर पर्शियन भाषेतील 'इराण' या शब्दाचा अर्थ आहे 'आर्यांची भूमी' (Land of the Aryans or 'nobel people'). ख्रिस्तपूर्व काळात झोरोस्ट्रियन श्रद्धा जपणाऱ्या या देशाची भाषा 'अवेस्तान' ही होती. या देशाचे पहिले राजघराणे म्हणून मिडियन घराण्याचा (राजा मिडास) उल्लेख केला जातो (इसवीसन पूर्व ७२८-५५०). सातव्या शतकापर्यंत या देशाचा धर्म 'झोरोस्ट्रियानिझम' हा होता. पर्शियन साम्राज्याचा विस्तार करणारा 'सायरस द ग्रेट' आणि 'दारियस द ग्रेट' या दोघांमुळे त्या काळातील हे सर्वांत मोठे व बलाढ्य साम्राज्य मानले गेले. त्या काळी 'ग्लोबल सुपर पॉवर' असे बिरुद योजले गेले असते, तर तो मान पर्शियन साम्राज्याला मिळाला असता, असे काही अभ्यासकांचे मत आहे. सिंधू नदीपासून भूमध्यसागरापर्यंत म्हणजे त्या काळच्या भारतापासून तुर्कस्तानपर्यंत हे साम्राज्य विस्तारले होते. इतिहासकाळात या साम्राज्याने रोमन साम्राज्याबरोबर सुमारे सहाशे वर्षे लढा दिला. इसवीसन ६३७ नंतर तेथे अरबी टोळ्यांचे आक्रमण झाले. अरबांबरोबरील एका लढाईत मात्र पर्शियाचा पराभव झाला आणि तेथे इस्लामचा प्रवेश झाला. खलिफांचे वर्चस्व प्रस्थापित झाले.

इराणची संस्कृती व समाजजीवन या सर्वांवर या घटनेचा फार मोठा परिणाम झाला. तरीही इस्लामला मान्यता देताना तेथे मूळ पर्शियन परंपरा टिकून राहिल्या. तसेच तेथे अरबी लिपी स्वीकारली गेली तरी पर्शियन भाषाही टिकली.

या परिवर्तनानंतरही इराणी नागरिकांनी कला, साहित्य, वास्तूरचनाशास्त्र, तत्त्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र, औषधशास्त्र अशा अनेक विद्याशाखांच्या अभ्यासात मोठे यश मिळविले. तेथील कलाकारांनी तयार केलेले मखमली गालिचे जगप्रसिद्ध झाले. इस्लामच्या इतिहासातील हे 'सुवर्णयुग' म्हटले जाते. यानंतर शिया व सुन्नी पंथ तेथे स्थापन झाले तरी इराणमध्ये नेहमीच शियापंथियांचा प्रभाव राहिला. धर्मांतर्गत अनेक घडामोडींनंतर आधुनिक काळातील इराणच्या दृष्टीने १५०१ ते १९२० हा काळ महत्त्वाचा ठरला. सफाविद, झांद, अफशरिद आणि कजार राजघराणी या काळात होऊन गेली. अठराव्या शतकाच्या अखेरीस तेथे 'इज्तिहाद'ला मान्यता मिळाली (तर्कशुद्ध विचार - logical, creative thinking करण्यासाठी केलेली प्रयत्नांची पराकाष्ठा म्हणजे 'इज्तिहाद'. कुरआन व हदीस यांच्या आधारे बदलत्या काळाशी सुसंवादी अशा पद्धतीने इस्लामचे आकलन करून घेण्याची प्रक्रिया म्हणजे 'इज्तिहाद'. विशेषतः कुरआन व हदीसमध्ये नसलेल्या बाबीसंदर्भात निर्णय घेताना 'इज्तिहाद'चा उपयोग करता येतो).

या नंतरच्या काळात इराणचा संबंध ब्रिटन, फ्रान्स, बेल्जियम, रशिया, हंगेरी, अमेरिका इत्यादी अनेक देशांबरोबर आला. व्यापारविषयक घडामोडी वाढू लागल्या. पश्चिम आशियातील तेलाचा पहिला साठा १९०८मध्ये इराणमधील 'मसजिद ए सुलेमान' येथे सापडला. त्या वेळी अमेरिका व ब्रिटन या दोन देशांनी तेलाच्या अर्थ व राजकारणात लक्ष घातले होते. त्यामुळे ब्रिटनने अँग्लो-पर्शियन तेल कंपनी स्थापन केली (याच कंपनीचे नामांतर पुढे 'ब्रिटिश पेट्रोलियम' असे झाले. यानंतर तेलविषयक आर्थिक घडामोडींत इराण ओढला गेला तो आजपर्यंत). दरम्यान, इराणची एकूणच घडी नीट बसावी यासाठी चालू असलेल्या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून १९०५ ते १९०९ या काळात तेथे प्रथमच घटनात्मक क्रांती (Constitutional Revolution) झाली. १९४९-१९५३, १९६०-१९६३ आणि १९७८-१९७९ या काळातही तेथे या विषयाशी संबंधित चळवळी घडून आल्या.

या नंतर १९२०-१९७९ हा काळ इराणमधील पहलवींची कारकीर्द म्हणून गाजला. रेझा खान या लष्करी अधिकाऱ्याने कजार राजघराण्याविरुद्ध बंड पुकारले

सत्ता मिळाल्यानंतर ते 'रेझा शाह खान' या नावाने ओळखले जाऊ लागले. ते सुधारणावादी, आधुनिकतेचे समर्थक पण हुकुमशाही वृत्तीचे होते. इराणच्या आधुनिकीकरणासाठी त्यांनी प्रयत्न केले. काही प्रमाणात त्यांना यश आले. पण रशिया व ब्रिटनला लांब ठेवून त्यांनी जर्मनीशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला तेव्हा १९४१ मध्ये ब्रिटन व रशियाने इराणवर आक्रमण केले आणि रेझा शाह खान यांना अधिकारपद सोडायला लावून त्यांचे पुत्र मोहम्मद रेझा शाह पहलवी यांना सत्तेवर आणले. दरम्यान, पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात तेलाच्या अर्थकारणाला गती येऊ लागली होती. १९५१ मध्ये तेथे राष्ट्रवादी नेते डॉ. मोहम्मद मोसेदेघ यांचा उदय झाला. पंतप्रधानपदी असताना त्यांनी अँग्लो-इराणियन तेल कंपनीचे राष्ट्रीयीकरण केल्याने त्यांची लोकप्रियता वाढली. या नंतर तेलाचे अर्थ व राजकारण डोळ्यापुढे ठेवून अमेरिका व ब्रिटनने त्यांना पदच्युत होण्यास भाग पाडले. सत्तासूत्रे पुन्हा मोहम्म्द रेझा शाह पहलवी यांच्या अमेरिकाधार्जिण्या सरकारच्या हाती आली. १९७३च्या सुमारास त्यांनी तेलाच्या भाववाढीच्या प्रश्नावरून अमेरिकेला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान, शाह यांच्या अमेरिकाधार्जिण्या धोरणांविरुद्ध कट्टर मुस्लिमांमध्ये गणले जाणारे अयातोल्ला खोमेनी आपल्या बाजूला जनमत वळवत होते. अखेरीस १९७९मध्ये 'इराणी क्रांती' (याला 'इस्लामिक क्रांती' असेही म्हटले जाते) झाली. अमेरिकेच्या साम्राज्यवादी धोरणांना विरोध करणारे मार्क्सवादी, तिसऱ्या जगाचे महत्त्व ओळखणारे आणि लोकशाहीचे व स्त्री-पुरुष समानतेचे आग्रही असणारे राष्ट्रवादी आणि इस्लाम धर्माचे कट्टर समर्थक असलेले मूलतत्त्ववादी या सर्वांचा या क्रांतीमध्ये समावेश होता. पण सत्ता गेली ती मूलतत्त्ववाद्यांच्या हाती. खोमेनी सत्तारूढ झाले.

**'इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण'**

अयातोल्ला खोमेनी यांनी इस्लामच्या कायद्याचे राज्य स्थापन केले. 'इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण'चा उदय झाला. या काळापासूनच इराण अधिक कट्टर इस्लामी राष्ट्र बनले. तेथील स्त्रियांवर हिजाब (कान व कपाळ झाकणारा मुस्लिम पद्धतीचा मोठा रुमाल) बांधण्याचे बंधन आले. एकूणच इस्लामचा प्रभाव व धर्मगुरूंचे महत्त्व वाढले. १९८० ते १९८८ या काळात इराण-इराक युद्ध झाले. खोमेनींच्या मृत्यूनंतर (१९८९) अली अकबर हाश्मी रफसंजानी यांच्याकडे सत्ता आली. १९९३मध्ये त्यांची फेरनिवड झाली. १९९७मध्ये सुधारणावादी नेते मोहम्मद खातामी-अर्दकानी यांनी सत्तासूत्रे स्वीकारली. त्यांच्या काळात अधिक नागरी स्वातंत्र्य मिळेल आणि सुधारणा घडून

येतील असे जनतेला वाटले होते. खातामींना थोडेफार यश मिळाले, पण नागरिकांची अपेक्षापूर्ती झाली नाही. तरीदेखील २००१मध्ये पुन्हा त्यांच्याच हाती कारभार सोपविण्यात आला. इराणमध्ये धार्मिक गटांचा प्रभाव वाढत असताना २००४च्या फेब्रुवारी महिन्यात सुधारणावाद्यांना निवडणुकीत सहभागी होण्यापासून रोखण्यात आले. आता तेथे अधिकच पुराणमतवादी गटाच्या हाती सत्ता आली आहे. २००५मध्ये महमूद अहमदी-नेजाद यांच्या हाती सत्तासूत्रे आली असून ते कट्टरपंथियांमध्ये मोडतात. १९७९नंतरच्या या काळात 'इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण' आणि अमेरिका यांच्यातील राजकीय संबंध तेलाच्या राजकारणामुळे आणि इस्लामी मूलतत्त्ववादामुळे ताणलेलेच राहिले.

पाश्चिमात्य देशांशी इराणचे राजकीय संबंध चांगले असावेत, असे रफसंजानींसारख्या नेत्यांना वाटते. तर अहमदी-नेजाद यांचा पाश्चात्य देशांना विरोध आहे. अमेरिका व ब्रिटन आणि इतर देशांमधील तेल उत्पादक कंपन्या भरपूर नफा मिळवतात आणि तेल उत्पादक देश व तेथील नागरिक गरीबच राहतात, ही तेल उत्पादक देशांची तक्रार आहे. इराणही या गटात मोडतो. त्यांच्या या अस्वस्थतेला धार्मिक कारणांची जोड मिळते आणि पाश्चात्य देशांविरुद्धचा त्यांचा द्वेष बळकट होत गेलेला आढळतो. त्यातच अण्वस्त्रसज्ज होण्याची इराणची महत्त्वाकांक्षा आणि दहशतवादाला इराण प्रोत्साहन देत असल्याचा अमेरिकेचा आरोप यांची भर पडली. अलीकडे, अमेरिकेचे तेलाचे अर्थकारण व राजकारण हे एक 'उघड गुपित' बनले आहे. त्यामुळे अमेरिकेने इराकबाबत जे केले तेच इराणबाबतही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून आता इराणही युद्धाच्या छायेत असल्याचे म्हटले जाते.

## (ब) मुक्तिपर्वाच्या प्रतीक्षेत....

या पार्श्वभूमीवर इराणमध्ये 'मखमली क्रांती' घडून येण्याची भीती इराणी सरकारला वाटते. कारण, हा अमेरिकेचा कट असल्याचा दाट संशय इराणी सरकारला आहे. अमेरिकेला व्हिएतनाम व इराक युद्धावरून प्रचंड टीका ऐकून घ्यावी लागली आहे. त्यामुळे इराणमध्ये (युद्ध न छेडता ?) अस्थिरता निर्माण करण्याचे धोरण अमेरिकी सरकारने आखले असल्याची शंकाही सरकारी गोटात उपस्थित झाली आहे. त्यासाठी अमेरिका लष्करी सामर्थ्याचा नव्हे तर 'मखमली क्रांती'चा आधार घेत आहे, असे इराणी सरकारला वाटते. अमेरिकास्थित इराणी अभ्यासकांना हाताशी धरून अमेरिका 'मखमली क्रांती'ची ठिणगी पाडण्याच्या प्रयत्नात असावी, अशी शंका इराणी सरकारला आली आहे. इराणमधील लोकशाहीवादी गटांना अमेरिकेने उघड

पाठिंबा दिला असून लाखो डॉलरचा निधीही उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे इराणमध्ये जर 'मखमली क्रांती'ची बीजे रोवली गेली असतील तर त्यांचा वृक्ष होऊ नये म्हणून अभ्यासासाठी वा इतर कारणांसाठी मायभूमीत आलेल्या इराणी अभ्यासकांना अटक करून त्यांची मुस्कटदाबी करण्याची कृती इराणच्या सरकारने केली आहे

इराणमधील संभाव्य 'मखमली क्रांती'चा उलगडा होतो तो सुटका करण्यात आलेले डॉ, जहानबेगलू यांची कारकीर्द व तत्कालीन चेकोस्लोव्हाकियातील 'मखमली क्रांती' या दोन बाबी समजून घेतल्यानंतर. १९६१ मध्ये जन्मलेले डॉ. जहानबेगलू हे तत्त्वज्ञ आहेत, लोकशाहीचे समर्थक आहेत. इराणमधील बुद्धिवादी गटाचे ते प्रतिनिधित्व करतात. पॅरिसमधील Sorbonne विद्यापीठातून त्यांनी पी.एचडी. प्राप्त केली. त्या नंतर ते हार्वर्ड विद्यापीठात अभ्यासक होते. मुख्य म्हणजे त्यांच्या प्रबंधाचा विषय आहे 'गांधीजींचे अहिंसेचे व सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान' हा. त्यांचे अनेक लेख व संशोधनपर अभ्यास प्रसिद्ध झाले आहेत. विविध संस्कृतींमध्ये सुसंवाद प्रस्थापित व्हावा यावर त्यांच्या लिखाणाचा भर. त्यांनी परदेशांतील अनेक तत्त्वज्ञांची भाषणे इराणमध्ये आयोजित केली होती. इराणमध्ये उदारमतवादी गट उभा राहण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. हा गट धार्मिक व ऐतिहासिक घटनांच्या प्रभावापासून दूर राहून आजच्या काळाशी सुसंगत अशा लोकशाही तत्त्वांना मान्यता देणारा आहे. या गटातील अनेक अभ्यासक विविध प्रकारच्या स्वयंसेवी संस्थांमध्ये सहभागी होत असून त्यांद्वारे लोकशाहीसमर्थक असा नागरी समाज इराणमध्ये उभा राहू लागला आहे. समाजावर प्रभाव पाडणारा नागरी गट हा सध्याच्या मूलतत्त्ववादी इराणी सरकारसाठी त्रासदायकच ठरू शकतो. म्हणून, सरकार या सर्व घटनांकडे बारीक नजर ठेवून आहे.

याशिवाय 'जर्मन मार्शल फंड' यांच्यासाठी केलेल्या संशोधनात जहानबेगलू यांनी इराणमधील लोकशाहीचे समर्थक (व मूलतत्त्ववादाचे विरोधक) आणि पूर्व - युरोपीय देशांमधील, विशेषतः तत्कालीन चेकोस्लोव्हाकिया येथील, लोकशाहीवादी समर्थक यांची तुलना केली आहे. इराणमधील नागरी समाज आणि सत्तारूढ मूलतत्त्ववादी यांच्यातील राजकीय सत्तेबाबतचा (अ)समतोल यांबाबतही त्यांनी काही विश्लेषण केले आहे. या संदर्भात जहानबेगलू यांनी प्राग येथे जाऊन तत्कालीन चेकोस्लोव्हाकियाचे नेते वाक्लेव्ह हावेल (Vaclav Havel) यांच्याशी चर्चा केली होती. मुळात 'मखमली क्रांती'ची संकल्पना तत्कालीन चेकोस्लोव्हाकियातूनच इराणमध्ये प्रवेशली आहे, असे अभ्यासक म्हणतात. त्यामुळे तेथे घडलेली 'मखमली क्रांती'व इराणमध्ये घडू शकणारी

'मखमली क्रांती' यांचा परस्परसंबंध अभ्यासकांनी का लावला आहे, हेही जाणून घेणे गरजेचे आहे (काहींनी याला 'पांढरा कट' - white coup - असेही संबोधले आहे). त्यातच (सध्याच्या) चेक रिपब्लिकच्या दृष्टीने २००७ हे वर्ष महत्त्वाचे आहे. याची तीन कारणे आहेत. (१) तेथील साम्यवादी सरकार कोसळण्याच्या घटनेला २००७मध्ये १८ वर्षे पूर्ण होत आहेत. 'चेक सिव्हिक फोरम'ची स्थापनाही तेव्हाच झाली होती (२) त्या वेळी तेथील 'मखमली क्रांती'ची ठिणगी पेटविण्यास कारणीभूत ठरलेल्या 'चार्टा ७७' या मानवाधिकारांबाबत असलेल्या मागणीपत्राला तीस वर्षे पूर्ण होत आहेत. हे मागणीपत्र 'मखमली क्रांती'त अग्रगण्य असणारे हावेल यांनी जारी केले होते हे विशेष. (३) तत्कालीन चेकोस्लोव्हाकियातील तत्त्वज्ञ व साम्यवादी सरकारचे विरोधक जान पॅटोका यांचे २००७ हे जन्मशताब्दी वर्ष आहे, तत्कालीन चेकोस्लोव्हाकियाचे साम्यवादी सरकार पॅटोका यांची चौकशी करीत असताना पोलिस कोठडीतच (वैद्यकीय उपचाराअभावी) त्यांचे मेंदूतील रक्तस्त्रावाने निधन झाले होते.

साम्यवादी सरकार असलेल्या तत्कालीन चेकोस्लोव्हाकियात लोकशाहीच्या स्थापनेसाठी लाखो नागरिकांनी शांततापूर्ण निदर्शने केली होती. या निदर्शकांची संख्या फार मोठी होती. आपली मागणी पूर्ण झाल्याशिवाय मागे न हटण्याचा त्यांचा निर्धारही मजबूत होता. या चळवळीतील आघाडीचे नेते हावेल हे होते. अखेरीस साम्यवादी सरकारला नागरिकांच्या मागणीचा विचार करून सत्ता सोडावीच लागली. हे सत्तापरिवर्तन अहिंसेद्वारे घडून आले. म्हणूनच ही क्रांती 'मखमली' ठरली. या पार्श्वभूमीवर जहानबेगलू व हावेल यांच्यातील चर्चा महत्त्वाची मानली जाते. कारण, १९८९ पूर्वीच्या काळात हावेल जसे अहिंसात्मक चळवळीचा एक अविभाज्य घटक बनून गेले होते त्याप्रमाणेच जहानबेगलूदेखील सत्तेपासून दूर असलेल्या इराणी नागरिकांच्या अहिंसात्मक चळवळीचा घटक बनले आहेत, असे मत मार्टिन बेक मात्सुस्तिक या अभ्यासकाने मांडले आहे. तत्कालीन चेकोस्लोव्हाकियात ज्याप्रमाणे हावेल यांना नागरिकांचा भरघोस पाठिंबा मिळाला त्याप्रमाणे इराणमध्ये लोकशाही समर्थकांचा पाठिंबा जहानबेगलू यांना मिळण्याची शक्यता आहे, अशी भीती इराणी सरकारला वाटू लागली असल्याचेही मात्सुस्तिक म्हणतात. किंबहुना १९७९मध्ये झालेल्या 'इराणी क्रांती'च्या वेळी डाव्या व उजव्या गटाचे प्राबल्य होते. आता मात्र लोकशाहीसमर्थक गटाचा जनमानसातील प्रभाव वाढू लागला आहे, असे इराणमधील सरकारला जाणवू लागले आहे, असेही ते नमूद करतात. मात्र किती टक्के नागरिकांचा लोकशाही चळवळीला पाठिंबा असावा याबाबतची

काही अधिकृत आकडेवारी त्यांनी दिलेली नाही. समानतेकडे जाणारे नवे जग अस्तित्वात येऊ शकते असा विश्वास इराणमधील लोकशाहीसमर्थक नागरिकांना वाटू लागला आहे, असे निरीक्षण ते नोंदवितात. त्यांच्या मते, इराणमधील नागरिक अहिंसा व लोकशाहीकडे झुकत असल्याची ही घटना कदाचित इराणपुरतीच मर्यादित असू शकेल. पण इतर इस्लामिक देशांमध्ये असे घडणारच नाही, असेही नाही. काही इस्लामिक देशांमध्ये तर इस्लाम, नागरी समाज आणि लोकशाही हे प्रश्न अधिकच गुंतागुंतीचे बनले आहेत, असेही त्यांना वाटते.

लोकशाहीविषयक चर्चासत्रे घडवून आणणारे आणि विविध संस्कृतींमध्ये सुसंवाद असण्यासाठी कार्यरत असणारे डॉ. जहानबेगलू यांनी बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांची भेट घेण्यासाठी अनेकदा भारताचाही दौरा केला. या संदर्भात ते गेल्या वर्षी भारतात आले होते. ही भेट संपवून ते इराणच्या विमानतळावर पोचले, त्याच दिवशी म्हणजे २६ एप्रिल २००६ रोजी त्यांना अटक करण्यात आली. त्यांची रवानगी झाली थेट एविन तुरुंगात. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांच्या अटकेचा निषेध करण्यात आला. त्यांच्या अटकेबाबत भाष्य करताना इराणमधील देशांतर्गत कामकाज खात्याच्या मंत्र्यांनी म्हटले की, असे अभ्यास-संशोधन करून इराणमध्ये 'मखमली क्रांती'ची ठिणगी पाडण्यासाठी जहानबेगलू एकप्रकारे अमेरिकेला उद्युक्तच करीत आहेत. तसेच इराणमध्ये 'मखमली क्रांती'चे वारे वाहात असल्याचे त्यांनी प्रथमच मान्य केले.

त्यांच्या सुटकेसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यवरांनी इराणच्या सरकारवर दबाव आणल्याने २८ ऑगस्ट २००६ रोजी त्यांची (काही अटींवर?) सुटका करण्यात आली. जहानबेगलू यांनी आपली 'चूक मान्य केल्या'चे वृत्त इराणच्या वृत्तसंस्थेने दिले आहे. सुटकेनंतर जारी केलेल्या निवेदनात जहानबेगलू यांनी इराणमध्ये मखमली क्रांती घडवून आणण्याची पार्श्वभूमी आपण अमेरिकेच्या मदतीने तयार करीत होतो, असे कबूल केले आहे. तसेच या नंतर आपण आंतरराष्ट्रीय पातळीवरील बौद्धिक चर्चांपासून दूर राहण्याचे ठरविले आहे, असेही स्पष्ट केले आहे. इराणमध्ये लोकशाही यावी असे स्वप्न पाहणारे आणि विविध संस्कृतींमध्ये चर्चा घडवून आणणारे, पन्नाशीलाही न पोहचलेले डॉ. जहानबेगलू अचानक असा निर्णय घेतात याचा अर्थ सरकारने त्यांना जबरदस्तीने ही भूमिका घेण्यास भाग पाडले आहे, असे म्हटले जाते.

जहानबेगालू यांच्याप्रमाणे इराणच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीचा अभ्यास करणाऱ्या इतरही संशोधकांवर इराणी सरकारचा रोष आहे.

म्हणूनही डॉ. हालेह एसफांदियरी व इतर संशोधकांना अटक करण्यात आली आहे. मात्र, विज्ञानविषयक संशोधन करणाऱ्यांना अशा अडचणींना सामोरे जावे लागत नाही. पण, इराणमधील घडामोडी जाणून घेण्यासाठी परदेशांतील गुप्तचर यंत्रणा इराणी संशोधकांशी संपर्क साधतात, असेही अभ्यासक म्हणतात.

इराणमधील पत्रकार अकबर गांजी यांनी, इराणी सरकार मानवाधिकारांचे उल्लंघन करून बुद्धिवाद्यांना व लेखकांना कसकसा त्रास देत आहे, वेळप्रसंगी त्यांची हत्याही कशी घडवून आणत आहे, याबाबतची लेखमाला प्रसिद्ध केली. परिणामी, त्यांची सहा वर्षांसाठी तुरुंगात रवानगी झाली. एविन तुरुंगातील परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांना उपोषणही करावे लागले. 'इस्लाम व लोकशाही' या विषयावर भाष्य करताना गांजी म्हणतात, ''शाह यांच्या विरोधातील क्रांती इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी ताब्यात घेतली. क्रांतीमुळे लोकशाहीची स्थापना होत नाही. आयात करूनही ती करता येत नाही. खरे तर, स्वर्ग निर्माण करण्यासाठी आम्ही क्रांती केली आणि प्रत्यक्षात मात्र नरकच निर्माण केला. आता जुलुमी व अन्यायकारी सरकार बदलण्यासाठी असहकार, अहिंसा यांचीच गरज आहे.''

अमेरिकेकडून आर्थिक मदत मिळणाऱ्या 'रेडिओ फार्दा'साठी काम करणाऱ्या पत्रकार पारनाझ अझिमा यांचा पासपोर्ट इराणी सरकारने जप्त केला असून त्यांना देशाबाहेर पडण्याची बंदी आहे. यापूर्वी, मूळच्या इराणी पण कॅनडात स्थायिक झालेल्या पत्रकार झाहरा काझेमी यांनाही इराणी सरकारने एविन तुरुंगात ठेवले होते. तेथे झालेल्या शारीरिक छळामुळेच त्यांचा मृत्यू झाल्याची घटनाही फार जुनी नाही. इराणचे जर्मनीतील माजी राजदूत व इराणच्या अण्वस्त्रविषयक धोरणात आघाडीवर असणारे आणि रफसंजानी यांच्याशी जवळीक साधणारे होसेन मुसावियान यांनाही अलीकडेच अटक करण्यात आली आहे. या अटकसत्रामागे महमूद अहमदी-नेजाद यांचा राजकीय सूड आहे किंवा कसे याचीही चर्चा आहे. देशातील सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांवरून नागरिकांचे लक्ष इतरत्र वळविण्यासाठी ही सरकारची राजकीय खेळी आहे, असेही म्हटले जाते.

बैठकीची शोभा वाढविणाऱ्या मखमली गालिच्यांमुळे जगप्रसिद्ध झालेल्या या देशात खरोखरच 'मखमली क्रांती'चे (Velvet Revolution) वारे वाहिले आणि त्या झंझावातात इतर मुस्लिम देश ओढले गेले तर जगाच्या राजकारणाला एक वेगळी दिशा मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# जागतिक 'अंमली' बाजार

खिसे ओसंडून वाहतील एवढा नफा मिळवून देणारे, अस्सल 'वाइन'पेक्षा मौल्यवान असणारे आणि तंबाखूएवढी लोकप्रियता मिळवलेले हेरॉइन हे जागतिक बाजारपेठेत फार मोठ्या प्रमाणात विकले जाणारे उत्पादन आहे. हेरॉइनच नव्हे तर कोकेन, हशीश आणि भावावस्थेवर परिणाम करणाऱ्या ॲम्फिटामाइनसारख्या बेकायदेशीर असलेल्या अंमली पदार्थांची जागतिक बाजारपेठ ही आज एक जागतिक समस्या बनली आहे. या बाजारपेठेवर नियंत्रण आणण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघातर्फे विविध देशांतील अधिकृत यंत्रणांच्या मदतीने सर्वेक्षण करण्यात येत असते. अंमली पदार्थ ज्यांपासून तयार करण्यात येतात त्या पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र किती आणि त्यातून किती उत्पादन मिळाले, याची काही आकडेवारी अशा सर्वेक्षणांद्वारे मिळविण्यात येते. या संदर्भात राष्ट्रसंघाने अलीकडे (जून २००७) प्रसिद्ध केलेल्या अहवालात काही बाबी नोंदविण्यात आल्या आहेत. तसेच, अंमली पदार्थांची समस्या बऱ्याच प्रमाणात नियंत्रणात आहे, हे मुख्य निरीक्षण या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या बाजारपेठेचा फेरफटका उद्बोधक ठरेल.

अंमली पदार्थांच्या उत्पादन साखळीतील एक मुख्य घटक आहे शेतकरी. हेरॉइन, कोकेन, हशीश हे तयार करण्यासाठी लागणारी अनुक्रमे अफू, कोका व कॅनाबिस (मारिजुआना) ही पिके ते घेत असतात. शेतात लावलेले हे पीक नष्ट करण्याचा धाक यंत्रणेकडून दाखवला गेला तरी यात खंड पडतोच असे नाही. शिवाय, संबंधित यंत्रणांच्या लक्षात येऊ नये यासाठी हे शेतकरी लागवडीची जागाही बदलत असतात. तरीदेखील राष्ट्रसंघाच्या अभ्यासांमधून बरीच माहिती उपलब्ध होते. जागतिक बाजारपेठेत उपलब्ध होणाऱ्या हेरॉइनपैकी ९२ टक्के हेरॉइन हे अफगाणिस्तानात पिकविल्या जाणाऱ्या अफूपासून बनविले जाते. गेल्या वर्षी अफगाणिस्तानातील अफूच्या लागवडीत फार मोठ्या प्रमाणावर वाढ झाली तरी जागतिक पातळीवर अफूच्या लागवडीखाली असलेल्या क्षेत्रात २०००च्या तुलनेत घट झाल्याचे आढळते. याचे कारण म्हणजे म्यानमार, लाओस आणि थायलंड या 'गोल्डन ट्रँगल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशांमध्ये अफूची लागवड कमी करण्याच्या प्रयत्नांना यश आले हे होय (२०००


सालाच्या तुलनेत या देशांतील लागवडीत ८० टक्क्यांनी घट झाली). अफगाणिस्तानातील ज्या भागांत सतत संघर्ष चालू आहे तेथे अफू व त्यापासून तयार होणाऱ्या हेरॉइनचे उत्पादन वाढल्याचे आढळते.

कोलंबिया, पेरू आणि बोलिव्हिया येथे कोकाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. कोकाच्या पानांपासून कोकेन बनविले जाते. २००० ते २००६ या काळात कोलंबियातील लागवडीत घट झाल्याने जागतिक पातळीवर कोकाच्या लागवडीखाली असलेले एकूण क्षेत्र २९ टक्क्यांनी घटले. हशीशच्या उत्पादनाबाबत मात्र नेमकी आकडेवारी उपलब्ध होऊ शकत नाही. कारण, सुमारे १७२ देशांमध्ये त्याचे उत्पादन केले जाते. मात्र मोरोक्कोशिवाय इतर देशांमधील फारशी माहिती मिळत नाही. तेथे हशीशचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. तेथे २००३मध्ये १ लाख ३४ हजार हेक्टर जमिनीवर हशीशची लागवड करण्यात आली होती. यांत घट होऊन २००५मध्ये ती ७६ हजार ४०० हेक्टर पर्यंत खाली आली.

अंमली पदार्थ ज्यांपासून तयार करण्यात येतात त्या पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र आणि प्रत्यक्षात होणारे अंमली पदार्थांचे उत्पादन यात बरीच तफावत आढळू शकते. कारण, बदलते हवामान व तत्सम बाबींचा विचार करता प्रत्यक्षात पिकांचे क्षेत्र घटले तरी तंत्रज्ञानाच्या मदतीने अंमली पदार्थांच्या उत्पादनांत वाढ होऊ शकते. २००६मध्ये अफगाणिस्तानात अफूच्या लागवडीत सुमारे ५० टक्के एवढी वाढ झाल्याने त्यापासून तयार होणाऱ्या हेरॉइनच्या प्रमाणातही मोठी वाढ होऊन ६०६ मेट्रिक टन इतके विक्रमी उत्पादन झाले. त्याचप्रमाणे कोकाच्या लागवडीचे क्षेत्र कमी झाले तरी कोकेनच्या उत्पादनात मात्र घट झाल्याचे दिसत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून कोकेनचे उत्पादन स्थिर राहिल्याचे आढळते. २००६मध्ये ते ९८४मेट्रिक टन इतके होते. कायद्याची मान्यता असलेल्या काही विशिष्ट उत्पादनांपासून ॲम्फिटामाइनसारखे पदार्थ बेकायदेशीररित्या बनवले जातात. त्यामुळे त्याच्या उत्पादनाबाबतची आकडेवारी समजून येत नसल्याने त्याबाबत अंदाजच मांडला जातो. हे उत्पादन जागतिक पातळीवर २००५ साली ४८० मेट्रिक टन इतके असावे.

वरील सर्व अंमली पदार्थांच्या बाजारपेठेची स्वतंत्र अशी कहाणी आहे. हेरॉईन तयार केले जाते अफूपासून आणि अफूचे सर्वांत जास्त उत्पादन अफगाणिस्तानात होते. अफगाणिस्तानात अफूच्या उत्पादनाचा वटवृक्ष कसा झाला, या प्रश्नाचे उत्तर दडले आहे विसाव्या शतकातील शीतयुद्धात ! विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत

आशियातील सर्वच देशांमध्ये म्हणजे इराण, अफगाणिस्तान, पाकिस्तान, भारत, म्यानमार, थायलंड, लाओस, व्हिएतनाम आणि चीन इत्यादी देशांमध्ये हे पीक घेतले जात होते. तसेच रशिया आणि तुर्कस्तानातही याची लागवड केली जात होती. पण दुसऱ्या महायुद्धानंतर साम्यवादी चीन आणि रशियाने या उत्पादनांवर बंदी घातल्याने तुर्कस्तान, अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि 'गोल्डन ट्रँगल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या थायलंड, लाओस व व्हिएतनाम या देशांमध्येच हे पीक घेतले जाऊ लागले. १९७०च्या दशकात इराण आणि तुर्कस्तान येथे लागवडीवर बंदी घालण्यात आल्याने 'गोल्डन ट्रँगल'मध्ये असणाऱ्या देशांमधील उत्पादन वाढले. या देशांमध्ये अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेने - 'सीआयए'ने - केलेल्या गुप्त कारवायांमुळेही येथील अफूच्या उत्पादनांत वाढ झाल्याचे म्हटले जाते. १९९०च्या सुरुवातीच्या काळात या देशांमध्ये एकूण सुमारे २ लाख हेक्टर जमिनीवर अफूची लागवड केली जात होती. पण २००१नंतर याही देशांमध्ये या लागवडीबाबत कडक कारवाई करण्यात आल्याने तेथील उत्पादन २०२ टनांवरून (१९९०) १४ टन (२००५) इतके खाली आले.





इराण, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान हे अफूउत्पादक देश 'गोल्डन क्रेसण्ट' म्हणून ओळखले जातात. यांपैकी इराणमध्ये झालेल्या इराणी क्रांतीनंतर तत्कालीन नेते

अयातोल्ला खोमेनी यांनीदेखील याबाबत कठोर उपाययोजना केल्याने तेथील उत्पादन घटले. याच दरम्यान, म्हणजे १९७९ मध्ये तत्कालीन सोव्हिएत रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण केले. तेव्हा तेथील मुजाहिदांना अमेरिकेकडून शस्त्रपुरवठा करण्यात येत होता तरी त्यांना युद्धासाठी आर्थिक मदतीची गरज होती. त्यामुळे ते अफूच्या व्यापाराकडे वळले. तसेच युद्धामुळे तेथील शेती उद्‌ध्वस्त झाली आणि तेथील शेतकऱ्यांना पाकिस्तानात आश्रय घ्यावा लागला. परतल्यानंतर या शेतकऱ्यांना कमी कालावधीत जास्त नफा मिळवून देणारे पीक घेणे भाग पडले. त्यामुळे तेथील अफूची लागवड वाढली. युद्ध संपल्यानंतर (१९८९) अमेरिकेकडून मदत मिळणे बंद झाले आणि मुजाहिदिनांचा आपापसांतील संघर्ष वाढला. तेव्हा त्यांनी याच व्यापारातून पैसा उभा केला. १९९४ पर्यंतच्या पाच वर्षांच्या काळात तेथील अफूच्या लागवडीखालील क्षेत्र १९८९ च्या तुलनेत दुपटीने तर उत्पादन तिपटीने वाढले.


१९९४मध्ये तेथे तालिबानचा प्रभाव वाढल्यानंतर उत्पादकांवर, अफूवर प्रक्रिया करणाऱ्यांवर व व्यापाऱ्यांवर कर बसविण्यात आले. यानंतर तेथे १९९९मध्ये ९१ हजार हेक्टर क्षेत्रातील अफूचे उत्पादन ४६०० मेट्रिक टन इतके वाढले (दरम्यानच्या काळात, पाकिस्तानातील 'आयएसआय' या गुप्तचर यंत्रणेनेही भारतात अस्थिरता

**Global cocaine production*, 1990 2006**




* revised data


निर्माण करण्यासाठी पंजाब तसेच काश्मीरमध्ये कार्यरत असणाऱ्या दहशतवादी गटांना पैसा पुरविण्यासाठी या बाजारपेठेचा वापर करून घेतल्याचे म्हटले जाते). २००१ मध्ये तेथील नेतृत्वाने संयुक्त राष्ट्रसंघाची मर्जी प्राप्त करण्यासाठी अफूच्या उत्पादनावर बंदी घातली. पण त्याच काळात अमेरिकेने तेथे दहशतवादविरोधी कारवाई केल्याने अफूच्या उत्पादनात वाढच झाली. २००४मध्ये तेथे १ लाख ३१ हजार हेक्टर जमिनीवर अफूची लागवड करण्यात आली. २००५मध्ये लागवडीखालील क्षेत्रात २१ टक्के घट होऊन ते १ लाख ४हजार इतके कमी झाले तरी उत्पादन मात्र ४१०० मेट्रिक टन इतके झाले. आज अफगाणिस्तानातील अर्थव्यवस्थेला या लागवडीचा आधार मिळाला आहे. गरीब शेतकऱ्यांना अफूच्या लागवडीचा फायदा झाला आहे. गेल्या वर्षी अफगाणिस्तानातील अफूची निर्यात ठोकळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) ५२ टक्के इतकी म्हणजे २७० कोटी अमेरिकी डॉलर एवढी झाली. त्यापैकी ५६ कोटी डॉलर ही रक्कम तीन लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना मिळाली. गव्हाचे पीक घेण्यापेक्षा अफूच्या





उत्पादनातून शेतकऱ्यांना कितीतरी अधिक नफा मिळतो. अफगाणिस्तानातील शेतकऱ्यांनी इतर पिके घेऊन हा प्रश्न सुटणारा नाही तर त्या देशाचा आर्थिक विकास हा खरा त्यामागील प्रश्न आहे, असे अभ्यासक म्हणतात. अलीकडील काही वर्षांत हेरॉइनची

बाजारपेठ विभागली गेली आहे. अफगाणिस्तानातील उत्पादन युरोप, मध्य आशियातील देश आणि आफ्रिका येथे विकले जाते. दक्षिण आशियातील देशांमधील अफू चीन आणि त्याच भागातील इतर देशांमध्ये विकली जाते. लॅटिन अमेरिकेतील अफूला अमेरिकेतील बाजारपेठ उपलब्ध होते. तसेच गेल्या काही वर्षांत या उत्पादनांची मागणी सातत्यशील असल्याने ती पूर्ण करण्यासाठी वाहतुकीच्या वेगवेगळ्या वाटाही (routs) शोधण्यात आल्या. हेरॉइनचा वापर अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराण, मध्य आशियातील देश, भारत आणि आफ्रिकेतील काही देशांमध्ये वाढला आहे. या देशांमध्ये गरिबी व एड्स्चे प्रमाण अधिक असल्याने या अंमली पदार्थांचे तेथील नागरिकांवर फारच दुष्परिणाम होतात, असे अलीकडच्या अभ्यासांवरून आढळले आहे.

मागणी व पुरवठ्याचा विचार करता जागतिक पातळीवरील कोकेनची बाजारपेठ तशी स्थिर राहिली आहे. २००० ते २००६ या काळात, कोकेनच्या लागवडीखालील



जमिनीचे क्षेत्रफळ सुमारे २९ टक्क्यांनी घटले आहे. कोलंबियात ही घट सुमारे ५२ टक्के इतकी झाली आहे. असे असले तरी कोकेनच्या उत्पादनात मात्र मोठी घट झालेली आढळत नाही.

अंमली पदार्थांच्या बेकायदेशीर व्यापारात हशीशची उलाढाल सर्वांत जास्त प्रमाणात होते. याचा ग्राहकवर्ग जगभरात सुमारे १६ कोटी इतका आहे. याचे उत्पादन अनेकानेक देशांमध्ये होत असल्याने त्याबाबतची कोणतीही नेमकी आकडेवारी उपलब्ध होत नाही. मोरोक्को येथील उपलब्ध माहितीनुसार २००३मध्ये तेथे १ लाख ३४ हजार हेक्टर जमिनीवर हे उत्पादन घेतले गेले तर, २००५मध्ये ७६ हजार ४०० हेक्टर जमिनीवर. हशीशचा ग्राहकवर्ग हा प्रामुख्याने अमेरिकेत होता. अलीकडे त्यात घट झाली असून आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेत त्याचा खप वाढल्याचा अंदाज आहे.

प्रयोगशाळेत कृत्रिम पद्धतीने तयार करण्यात येणाऱ्या ॲम्फिटामाइनची बाजारपेठ अलीकडच्या काळात स्थिर राहिली असली तरी १९९०च्या दशकात मात्र तिच्यात बरीच वाढ झालेली होती. याचे उत्पादन प्रामुख्याने म्यानमार, चीन आणि फिलिपाइन्स या देशांमध्ये होते. कॅनडा आणि मेक्सिको येथून बेकायदेशीररीत्या आयात करण्यात आलेल्या काही रसायनांच्या मदतीने ते अमेरिकेतही तयार करण्यात येते. दक्षिण आफ्रिकेतही त्याची निर्मिती होते आणि त्याची बाजारपेठही तेथे आहे. नेदरलँड्स्, पोलंड आणि बेल्जियम या युरोपीय देशांमध्येही ते तयार केले जाते. हेरॉईन आणि कोकेनच्या तुलनेत ॲम्फिटाइनची बाजारपेठ मोठी आहे सुमारे अडीच कोटी.

अंमली पदार्थांच्या व्यापारातील पैसा जागतिक दहशतवादाकडे वळत असल्याच्या संशयावरून तो रोखण्यासाठी विविध देशांमधील संबंधित अधिकारी अनेक ठिकाणी धाडी घालून हा माल जप्त करीत असतात. विशेषतः संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवारीनुसार २००५मध्ये कोकेनच्या एकूण उत्पादनापैकी ४२ टक्के साठा आणि हेरॉईनच्या एकूण उत्पादनापैकी २६ टक्के साठा जप्त करण्यात आला. विविध देशांमधील संबंधित यंत्रणांच्या सहकार्याने कोकेनच्या एकूण जप्त केलेल्या साठ्यापैकी ५८ टक्के साठा दक्षिण अमेरिका, मध्य अमेरिका आणि कॅरिबियन भागांत २००५मध्ये जप्त करण्यात आला. तसेच सुमारे ४३ मेट्रिक टन ॲम्फिटामाइनही जप्त करण्यात आले. हशीशचे साठे मात्र मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात यश आलेले नाही.

अंमली पदार्थांच्या या बाजारपेठेची एक वेगळी बाजू आहे ती पर्यावरणाची. या पदार्थांच्या उत्पादनामुळे व त्यांच्या चोरट्या व्यापारामुळे परिसंस्था (इकोसिस्टिम्स) व

जैविक विविधता धोक्यात येत असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. मानवी वस्तीपासून दूरदूरच्या भागांत अंमली पदार्थांची लागवड करणे सोयीचे जात असल्याने उत्पादक अशा जागा हेरत असतात. मग त्या जागा शोधण्याचे आव्हान अधिकऱ्यांपुढे असते. हे बरेच जोखमीचे काम असल्याने त्या वेळी परिसंस्थांच्या अभ्यासकांना त्यांच्याबरोबर जाता येत नाही. त्यामुळे याबाबत निश्चित अशी माहिती मिळविणे हे अभ्यासकांसाठी अवघड काम होऊन बसते. सुरक्षेचा विचार करता अशा ठिकाणी अभ्यासक एकटे वा गटाने जाणेही धोक्याचे ठरू शकते. या अडचणींतूनही कोलंबियातील जैवविविधतेचा अभ्यास करण्यात आला आहे. त्या अभ्यासातून असे आढळले की, कोलंबियातील ॲमेझॉनच्या प्रदेशात कोकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते तेव्हा तेथे जंगलांचा ऱ्हास होण्याचे प्रमाणही उच्च पातळीवर पोहचले होते. न्यूयॉर्क येथे संशोधन करीत असलेल्या एका महिलेने विविध स्रोतांमधून माहिती मिळवून जीवाचा धोका लक्षात घेऊन टोपण नावाने बरीच माहिती प्रसिद्ध केली. त्यानुसार जंगलतोडीमुळे पक्ष्यांच्या अनेक प्रजाती नष्ट होत असल्याचे आढळले. पण हा प्रश्न वृक्षतोड व पक्ष्यांपुरताच मर्यादित राहिला नाही. अंमली पदार्थांचे पीक नष्ट करण्यासाठी संबंधित विभागाने विमानातून काही रसायने फवारल्याने त्याचा जैविक विविधतेवर विपरीत परिणाम घडून आला. अशा विषयांबाबत संशोधन करणाऱ्या एका संशोधकाचे दोन वेळा अपहरण करण्यात आल्याने नंतर या विषयाचा अभ्यास करण्याचे धाडस कोणी केले नाही. शिवाय संशोधकांनी असे अभ्यास केले तरी हे अहवाल प्रसिद्ध करण्यासही संस्था तयार नसतात. त्यामुळे संशोधनासाठी निधी उपलब्ध होणेही अवघड बनते.

अंमली पदार्थांचे उत्पादन व बाजारपेठ यांवर नियंत्रण आणण्यापेक्षा जागतिक पातळीवर काही वेगळे उपाय योजले पाहिजेत, असे आता म्हटले जात आहे. या पदार्थांची मागणीच कमी होईल तसेच विविध देशांमधील शेतकरी हे पीक घेणारच नाहीत यासाठी उपाययोजना करण्यात यावी, असे सुचविण्यात आले आहे. या संदर्भात शिक्षण, आरोग्य व रोजगार या मूलभूत बाबींची पूर्तता करणे गरजेचे ठरावे. अंमली पदार्थांचे उत्पादन व व्यापार रोखण्यासाठी कडक कायदे आणि विविध देशांमधील सर्वंकष आर्थिक विकास याला महत्त्व देण्यात यावे असेही म्हणण्यात आले आहे. अंमली पदार्थांच्या व्यापारातून मिळणारा पैसा, यासंबंधी विविध टप्प्यांवर होणारा भ्रष्टाचार आणि त्यात असणारा जीवाचा धोका यांमुळे हा सर्व व्याप रोखणे हे आजघडीला तरी सर्वच देशांसाठी एक मोठे जागतिक आव्हान बनले आहे. ✿✿

# उद्योगांनी आरंभला 'उद्योग' प्रशिक्षणाचा

अलीकडील काळात भारतीय उद्योगांना चांगल्या गुणवंत, प्रशिक्षित, कुशल मनुष्यबळाची चणचण भासू लागली आहे. अशी टंचाई ही केवळ माहिती तंत्रज्ञान तसेच माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा पुरविणाऱ्या उद्योगाच्याच काय ती पाचवीला पुजलेली आहे, अशी आजवरची धारणा होती. परंतु आता हे चित्र पालटते आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राव्यतिरिक्त, विविध उत्पादन क्षेत्रांत कार्यरत असलेले वस्तुनिर्माण उद्योग, बांधकाम व्यावसायिक यांसारख्या व्यवसाय क्षेत्रांनाही आता चांगल्या प्रशिक्षित मनुष्यबळाची वानवा भासू लागली आहे. 'गरज ही शोधाची जननी असते', या म्हणींनुसार भारतीय संघटित 'कॉर्पोरेट' विश्वाने आपल्यापरीने या चणचणीवर तोडगा शोधून काढण्यासाठी कंबर कसल्याच्या पाऊलखुणा काही क्षेत्रांत उमटत आहेत. हा तोडगा आहे, आपल्या व्यवसायाला गरज असणाऱ्या प्रशिक्षित मनुष्यबळाचा पुरवठा बिनबोभाट सुरू राहावा यासाठी कामगार प्रशिक्षणाचे उपक्रम हाती घेण्याचा !

आर्थिक पुनर्रचना प्रक्रियेचा, उदारीकरणाचा हा पैलू, निदान आजवर तरी, इतक्या प्रकर्षाने सामोरा आला नव्हता. अर्थकारणातील बदलत्या प्रवाहांची दखल घेत भारतीय शिक्षणपद्धतीत, विशेषतः उच्च शिक्षणपद्धतीत कशा प्रकारचे बदल अपेक्षित आणि आवश्यक आहेत, या बाबतची चर्चा विविध व्यासपीठांवरून अधूनमधून झडत असते. मात्र, देशातील व्यावसायिक शिक्षणाची प्रचलित व्यवस्था, या शिक्षणाचा दर्जा, व्यवसायशिक्षणाच्या विद्यमान सुविधा, त्यांची पर्याप्तता, या शिक्षणप्रणालीत निकडीच्या भासणाऱ्या सुधारणा व बदल यांसारख्या विविध बाबींचा ऊहापोह या आदानप्रदानादरम्यान त्या मानाने क्वचितच होतो. नेमक्या याच मुद्याची चिकित्सा सखोलपणे होण्याची निकड आता सर्वच संबंधितांना जाणवू लागली आहे.

विविध उद्योगव्यवसायांना जाणवणाऱ्या प्रशिक्षित मनुष्यबळाच्या चणचणीची कारणे व स्वरूप तसे वेगवेगळे आहे. उदारीकरणाचा पायरव कानी येऊ लागल्यानंतर सर्वाधिक भाग्य फळफळले ते माहिती तंत्रज्ञान तसेच माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा पुरविणाऱ्या उद्योगक्षेत्राचे. ज्ञानाधिष्ठित अशा २१ व्या शतकाचा प्रतिनिधी गणल्या जाणाऱ्या या उद्योगाच्या विकासासाठी भारत ही त्या मानाने सुपीक अशीच भूमी

ठरली. तरुणांचे संख्यात्मक वैपुल्य असलेले पूरक आणि पथ्यकर असे 'डेमोग्राफिक प्रोफाइल', देशात औरसचौरस विस्तारलेली उच्च शिक्षणाची प्रणाली व व्यवस्था आणि इंग्रजी जाणणाऱ्या होतकरूंचे मोठे प्रमाण ही सारी परिस्थिती या उद्योगशाखेच्या विस्तारास कमालीची उपकारक ठरली. या उभय क्षेत्रांचा व्याप वाढला, या उद्योगात रोजगार मिळालेल्यांना नेत्रदीपक मेहेनताना मिळू लागला आणि अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, बांधकाम यांसारख्या व्यवसायक्षेत्रांना तरुण प्रशिक्षित अभियंत्यांची, संबंधित ज्ञानशाखांमधील पदवीधरांची चणचण भासू लागली कारण "जो उठतो तो 'आय टी'कडेच धाव घेतो", अशी स्थिती आजही आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासाबरोबरच या उद्योगास निकड असणाऱ्या प्रशिक्षणाची सुविधा पुरविणाऱ्या अनेकानेक संस्था ठायीठायी उगवल्या. परंतु त्यामुळेही परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. याची कारणे दोन. एक तर माहिती तंत्रज्ञान उद्योगाच्या गरजेच्या तुलनेत या संस्थांमधून बाहेर पडणारे प्रशिक्षित तरुण तसे पुन्हा कमीच होते. दुसरे म्हणजे 'आय टी' क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण पुरविणाऱ्या संस्थांचे जाळे विस्तारले तरी या संख्यात्मक वाढीमध्ये गुणवत्तेचा बळी गेला.

या वास्तवाचे दुष्परिणाम पुन्हा विविध उद्योगशाखांना भोगावे लागले, लागत आहेत. प्रशिक्षित मनुष्यबळास जोमदार मागणी असल्याने 'आय टी'कडे तरुणांचा वाढता ओढा राहिला. मागणीच्या तुलनेत पुरवठा तोकडा राहिल्याने सरासरी मेहेनतान्याची कमान सातत्याने चढती राहिली. यामुळे, अन्य उद्योगक्षेत्रांना एकीकडे प्रशिक्षित अभियंत्यांची चणचण भासत असतानाच दुसरीकडे मनुष्यबळावरील वाढत्या खर्चापायी भारतीय माहिती तंत्रज्ञान उद्योगाच्या जागतिक स्पर्धात्मकतेवर घाला आला. विद्यमान परिस्थिती आज काहीशी अशीच आहे. आता या वास्तवातही आणखी एक गुणात्मक बदल आढळून येतो. चांगल्या गुणवान, कुशल मनुष्यबळाची चणचण हे वास्तव, निदान आजवर तरी, केवळ उच्च व्यावसायिक कौशल्ये व प्रशिक्षण धारण करणाऱ्या 'व्हाइट कॉलर' कर्मचाऱ्यांच्या उपगटापुरतेच सीमित होते. मात्र, अलीकडे चित्र वेगाने पालटत आहे. कुशल, अर्धकुशल, अकुशल अशा कामगार -कर्मचाऱ्यांच्या विविध गटांत आज मागणी व पुरवठा यांतील तफावत रुंदावताना दिसते. संबंधित उद्योगांनीच पुढाकार घेऊन कामगार प्रशिक्षणाच्या उपक्रमांद्वारे या समस्येवर उपाय शोधण्याचे प्रयत्न काही ठिकाणी होत आहेत. बांधकाम क्षेत्राचे उदाहरण या संदर्भात खचितच मननीय ठरावे.

**प्रशिक्षणाचे पथदर्शक 'बांधकाम'**

कुशल, अकुशल, अर्धकुशल अशा विविध गटोपगटांतील कामगार - कष्टकऱ्यांना रोजगार उपलब्ध करून देणारे बांधकाम हे शेतीखालोखालचे दुसऱ्या क्रमांकावरील क्षेत्र. अशा या बांधकाम क्षेत्रात, देशभरातच गेल्या सुमारे दशकभरात घसघशीत बदल घडून आल्याचे दाखले मिळतात. बांधकाम क्षेत्राचा अंतर्भाव 'मूलभूत उद्योग' या गटात होतो वा केला जातो. कारण, हा एक असा उद्योग आहे की ज्याला चालना मिळाली वा दिली गेली की अर्थकारणातील अन्य संलग्न उद्योगांच्या चक्रांनाही गती मिळते. बरे, गंमत म्हणजे बांधकाम क्षेत्र गतिमान झाल्याने ज्या संलग्न उद्योगांना गती लाभते. ते उद्योगही पुन्हा 'मूलभूत उद्योग' याच गटात बव्हंशी मोडतात. सीमेंट, पोलाद, खाण, वाहन व वाहतूक ही काही उदाहरणे वानगीदाखल. १९९१ सालानंतर, देशभरातील औद्योगिक क्षेत्राची जी पुनर्रचना सुरू झाली त्यात एकंदरच उद्योगक्षेत्रावर मंदीचे सावट बराच काळ रेंगाळले. हे सावट दूर करण्याचा एक उपाय म्हणून सरकारने बांधकाम उद्योगाला चालना मिळावी यासाठी सातत्याने पूरक व प्रोत्साहक अशी चलनविषयक धोरणे प्रदीर्घकाळ राबविली. घरबांधणी क्षेत्रास नानाविध सवलती देणे, घरबांधणीसाठी बँकांच्या माध्यमातून पुरेसा निधी हमखास प्राप्त होईल याची दक्षता घेणे, गृहकर्जांवरील व्याजाचे दर आकर्षक पातळीवर राखणे यांसारख्या तरतुदींचा त्यांत अंतर्भाव होता.

या धोरणाच्या आखणी-अंमलबजावणीस आणखी एका पैलूचे अस्तर जोडलेले होते. हा पैलू आहे रोजगारनिर्मितीचा. आर्थिक पुनर्रचना पर्वाच्या आजवरच्या दीड दशकी वाटचालीदरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा वेग लक्षणीय राहिलेला असला तरी ही प्रगती वा वाढ बहुशः 'जॉबलेस ग्रोथ' या 'कॅटेगरी'त मोडणारी अशीच आहे, या वास्तवावर विविध अभ्यासांनी आकडेवारीनिशी प्रकाश टाकलेला आहे. माहिती तंत्रज्ञान तसेच माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा, बँकिंग, विमा, पर्यटन, वित्तीय सेवा, म्युच्युअल फंड, व्यापार व वितरण, सल्लासेवा, करमणूक यांसारख्या नवनवीन सेवांच्या माध्यमातून रोजगार संधींचा परीघ वाढताना दिसत असला तरी या संधी मुख्यतः उच्च शिक्षित-प्रशिक्षित उमेदवारांसाठीच उपलब्ध होत आहेत. अशिक्षित, अर्धशिक्षित, अकुशल, अर्धकुशल मनुष्यबळाच्या रोजीरोटीचा प्रश्न हलका करण्यास या क्षेत्रांना त्या अर्थाने मर्यादा आहेत. शेती हा एकच असा उद्योग आहे की जेथे सर्व शैक्षणिक स्तरांतील गरजूंना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मात्र, अलीकडील काही

वर्षांत शेतीमधील सरकारी तसेच खासगी गुंतवणूक रोडावल्याने कृषी तसेच कृषिसंलग्न क्षेत्रांमध्ये निर्माण होणाऱ्या रोजगारसंधींवरही आच आलेली आहे. त्यातच, श्रमांच्या बाजारपेठेत नव्याने प्रवेशणाऱ्या रोजगारेच्छूंचा ओढा हा शेतीखेरीज अन्य क्षेत्रांकडेच प्रामुख्याने वाढतो आहे.

हा बदलता 'ट्रेन्ड' ध्यानात घेता, अगदी प्रशिक्षित अभियंत्यापासून ते थेट पूर्णतः अकुशल बिगाऱ्यापर्यंत सर्व कौशल्यस्तरांतील कामगार -व्याबसायिकांना उपजीविकेच्या संधी मोकळ्या करणाऱ्या बांधकाम क्षेत्रासारख्या उद्योगाच्या वाढविस्तारास मोकळीक देण्याचे सरकारचे धोरण हे समजण्यासारखेच होते. बांधकाम उद्योगास सुगीचे दिवस येण्यास मागणीच्या अंगानेही उपकारक बदल घडून येत होते व आहेत. माहिती तंत्रज्ञान तसेच माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा उद्योगाच्या भरभराटीबरोबरच या क्षेत्रांची बांधकामविषयक गरज आणि पर्यायाने मागणीही वाढू लागली. त्याच वेळी किरकोळ व्यापार तसेच करमणुकीसारख्या सेवा क्षेत्रांमध्येही मूलभूत स्वरूपाचे बदल घडून येत होते. माहिती तंत्रज्ञान उद्योगात रोजगार मिळालेला नवश्रीमंत तरुण ग्राहकांचा एक उभरता वर्ग ग्राहकोपयोगी जिनसांच्या बाजारपेठेत मोठ्या जोमाने सक्रिय बनत होता. परिणामी, 'मॉल्स्, 'मल्टिप्लेक्सेस्', 'इंटरनेट कॅफेज्' यांसारख्या व्यावसायिक बांधकामांचे मोठ्या शहरांत जणू पेवच फुटले. त्याच वेळी, मोठ्या शहरांच्या परिसरांत एकवटणाऱ्या माहिती तंत्रज्ञान उद्योगांच्या विस्ताराबरोबरच तिथे काम करणाऱ्या अभियंते, कर्मचाऱ्यांकडून निवासी गाळ्यांच्या बांधकामांनाही जोरदार मागणी येऊ लागली. महानगरांची आकाशरेखाही बदलत होती. शहरांच्या परिघावरील एकेकाळची शेतीची, लागवडीखालील जमीन वेगाने बांधकामाखाली येत होती व आहे. हॉटेल्स, मॅरेज हॉल्स्, नर्सरीज्, कॅफे टेरिया, रो -हाउसेस्, टूरिस्ट रिसॉर्ट्स्, हॉलिडे होम्स्, फार्म हाउसेस्, ॲम्युजमेन्ट पार्क्स् अशी नानाविध बांधकामे वेगाने साकारत आहेत. आजही ही प्रक्रिया मंदावलेली नाही.

बांधकाम उद्योगाची चौफेर वाढ हा या सगळ्या घडामोडींचा अपेक्षित असाच परिणाम आहे. या विस्तारापायी सीमेंट तसेच पोलादाच्या किंमतींही तापल्या. आता अलीकडे एकंदरच चलनवाढीस आळा घालण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने जी पाउले उचलली त्यांमुळे गृहबांधणी क्षेत्राकडे वाहणाऱ्या कर्जपुरवठ्यावरील व्याजाचे दरही अंमळ वाढले. परंतु, त्यामुळे या उद्योगाचा तोंडवळा भविष्यात एकदमच बदलून जाईल, असे मुळीच नव्हे. आजमितीस या उद्योगाची उलाढाल जवळपास ३० ते ३५

हजार कोटींच्या घरात आहे. अदमासे तीन कोटी व्यक्ती या उद्योगात रोजीरोटी कमावत आहेत. यातील सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे यापैकी बहुसंख्य कामगार हे 'अकुशल' या गटात मोडणारे आहेत. आगामी पाच वर्षांत बांधकाम उद्योगाची उलाढाल सुमारे ५० हजार कोटींच्या घरात जाईल, असा अंदाज या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. त्याचबरोबर, या क्षेत्रात आणखी सुमारे नऊ कोटी लोकांना नव्याने रोजगार उपलब्ध होण्याची शक्यताही वर्तविली जाते. या नऊ कोटींपैकी सहा कोटी कामगार हे 'अकुशल' या गटातील, तर, उर्वरित तीन कोटी कामगार हे 'अर्धकुशल' या गटातील असतील, असा कयास आहे.

एकट्या बांधकाम क्षेत्रालाच आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाच्या संख्यात्मक तसेच गुणात्मक परिमाणांची कल्पना या साऱ्या तपशीलावरून येते. मुख्य प्रश्न असा आहे की या क्षेत्राला निकड असणारा मनुष्यबळाचा हा पुरवठा भविष्यकाळात सातत्यशील राहील का, हा. त्यातल्या त्यातही तुलनेने गंभीर समस्या असणार आहे ती अर्धकुशल आणि कुशल कामगारांच्या उपलब्धतेची. कारण, कुशल कामगारांची अनुपलब्धता हे बांधकाम उद्योगासमोरचे आजमितीचेच मोठे आव्हान आहे. बांधकाम उद्योग आणि माहिती तंत्रज्ञान उद्योग या उभय उद्योगांमध्ये यामुळे आज एक मजेदार साधर्म्य साकारले आहे. माहिती तंत्रज्ञान उद्योगातील दिग्गज राखीव अभियंते - तज्ज्ञांची कुमक कायमच पदरी बाळगतात. सद्य:स्थितीत, बांधकाम उद्योगातील मोठ्या कंपन्याही अनुभवी, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा (उदाहरणार्थ सुपरवायझर्स) राखीव फौजफाटा जोपासताना दिसतात. न जाणो उद्या एखादे मोठे 'प्रॉजेक्ट' आले तर आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ जवळ नसल्याने त्या कामावर पाणी सोडण्याची नामुष्की ओढवू नये, असा सावधगिरीचा विचार यामागे असतो. ज्या वेळी आणि जितका वेळ प्रत्यक्ष काम नसेल तेव्हा या राखीव कर्मचाऱ्यांच्या फौजफाट्यास प्रशिक्षणामध्ये गुंतवून ठेवले जाते. ही एक प्रकारची गुंतवणूकच !

बांधकाम उद्योगाच्या चलतीपायी या व्यवसायाला एकंदरच मनुष्यबळाचा तुटवडा अलीकडील काही वर्षांत जाणवतो आहे. कुशल कर्मचाऱ्यांची तर वानवा आहेच आहे परंतु, अर्धकुशल आणि कुशल कामगारांचीही चणचण मोठ्या संघटित बांधकाम व्यावसायिकांना सामोरी येते आहे. या वास्तवाची एक थेट परिणती कामगारांच्या मजुरीचे दर उंचावण्यात झाल्याचे या क्षेत्राने अनुभवले आहे. अगदी बिगारी काम करणाऱ्या अकुशल मजुरांच्या रोजंदारीच्या दरांतही अलीकडील पाच वर्षांत दोन ते

अडीच पट वाढ घडून आलेली दिसते. केवळ इतकेच नाही तर, मजुरांकडे बघण्याच्या दृष्टिकोणातही परिवर्तन घडून येताना दिसते. चांगल्या मजुरी दराबरोबरच कामाच्या ठिकाणी निवासाची सुविधा, घरगुती वापरासाठी तसेच पिण्यासाठी पाणी, बहिर्दशेची व्यवस्था, काही ठिकाणी तर कामगारांसाठी भोजनाची यंत्रणा अशाही सोयी पुरविण्याकडे बांधकाम व्यावसायिकांचा कल आताशा वाढताना दिसतो. कामगारांना अशा सुविधा पुरविण्यापायी बांधकाम व्यावसायिकांवर खर्चाचा भार पडतो. त्याच वेळी, कामगारांच्या एकंदरच तुटवड्यापायी ज्या अशिक्षित, अकुशल वा अर्धकुशल कामगारांना कामावर ठेवावे लागते अशा कामगारांपायीही बांधकाम व्यावसायिकांवरील खर्चाचा बोजा वाढतो. असे अकुशल वा अर्धकुशल कामगार नेमण्याच्या अपरिहार्यतेपायी प्रसंगी कामात चुका होतात. त्या सुधारून घ्याव्या लागतात. त्यात वेळ तसेच बांधकाम साहित्याचा व्यय होतो. कामगारांच्या उपलब्धतेशी संबंधित अशा नानाविध समस्यांना तोंड देत सध्या भारतीय बांधकाम क्षेत्र वाटचाल करीत आहे.

तंत्रशिक्षण देणाऱ्या ज्या संस्था व जी प्रणाली देशभरात मौजूद आहे ती यंत्रणा बांधकाम उद्योगाच्या कुशल मनुष्यबळविषयक गरजांची पूर्तता का करू शकत नाही, अथवा, त्या गरजांची पूर्ती करण्यात ही यंत्रणा नेमकी कोठे कमी पडते असे दोन प्रश्न मग स्वाभाविकच उद्‌भवतात. या उभय प्रश्नांची उत्तरे दोन बाबींमध्ये रुजलेली आहेत. एकतर, बांधकाम व्यवसाय आणि विविध प्रकारचे तंत्रशिक्षण देणाऱ्या सरकारी प्रशिक्षण संस्था व यंत्रणा यांच्यात परस्परसंवादाचा सध्या पूर्ण अभाव आहे. परिणामी, कोणत्या प्रकारच्या प्रशिक्षणाची, कोणत्या कौशल्यांनी युक्त अशा मनुष्यबळाची निकड बांधकाम व्यवसायास भासते, त्या प्रकारच्या प्रशिक्षणाचा समावेश विद्यमान अभ्यासक्रमात आहे किंवा नाही या संदर्भातील चर्चेस, विचारविनिमयास, आदानप्रदानास आणि त्यावर आधारित अनुरूप अशा कृतीस सध्याच्या व्यवस्थेत वावच नाही.

सरकारी प्रशिक्षण संस्थांमधून होणारा प्रशिक्षित मनुष्यबळाचा पुरवठा आणि बांधकाम व्यवसायाच्या प्रशिक्षित मनुष्यबळविषयक गरजा यांतील तफावतीचे दुसरे कारण हे बांधकाम व्यवसायाच्या अंगभूत गतिमानतेमध्ये रुजलेले आहे. अलीकडच्या काळात बांधकाम पद्धतीत, बांधकामाच्या तंत्रज्ञानात मूलभूत स्वरूपाचे अनेक बदल घडून आले आहेत. बांधकाम प्रणालीचे यांत्रिकीकरणही घडून येत आहे. स्वयंचलित यंत्रांचा वापर वाढतो आहे. प्रगत तंत्रज्ञानाचे उपयोजन होत आहे. साहजिकच हे नवतंत्र आत्मसात करू शकेल, नवनवीन यंत्रसामग्री सफाईदारपणे हाताळू शकेल, यंत्रतंत्रांमध्ये

सातत्याने घडून येत असलेल्या बदलांना आत्मविश्वासाने सामोरे जाऊ शकेल असे प्रशिक्षित, तज्ज्ञ मनुष्यबळ जवळ असणे ही आजच्या आघाडीच्या, अग्रगण्य बांधकाम व्यावसायिकांची गरज बनली आहे. गंमत म्हणजे नेमक्या याच यंत्रतंत्रांचा परिचय, त्यांच्या हाताळणीचे प्रशिक्षण देण्याच्या सुविधा (निदान आजमितीस तरी) सरकारी तंत्रशिक्षण संस्थांमधून उपलब्ध नाहीत. बांधकाम उद्योगातील काही मोठ्या संघटित आणि द्रष्ट्या कंपन्यांनी या सगळ्यांवर तोडगा शोधून काढण्यासाठी जारीने प्रयत्न चालविले आहेत.

हा उपाय आहे आपल्याला गरज असलेल्या प्रशिक्षित मनुष्यबळाचा पुरवठा करणाऱ्या यंत्रणा-प्रणाली आपणच निर्माण करण्याचा - बांधकामविषयक दर्जेदार आणि आधुनिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था वा देणारी एखादी संस्था स्थापन करण्याचा ! बरे, यासाठी होतकरू प्रशिक्षणार्थी तरी कसे व कधी निवडावयाचे.... तर, थेट शालेय स्तरावरच. माध्यमिक अथवा उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या मुलांनाच निवडावयाचे. त्यांना सर्वसाधारणपणे सहा महिने ते एक वर्ष इतक्या कालावधीचे प्रशिक्षण पुरवावयाचे. या प्रशिक्षणादरम्यान बांधकामविषयक 'थिअरी'प्रमाणेच प्रत्यक्षानुभवाचेही धडे या शिक्षणार्थींना द्यावयाचे. बांधकामात वापरल्या जाणाऱ्या यंत्रतंत्रांच्या थेट हाताळणीचा परिपाठ त्यांना व्हावा अशा प्रकारे या प्रशिक्षणाची आखणी-अंमलबजावणी करण्याचा विचार यामागे मुख्यत्वाने आहे. या प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना मुशाहिरा देण्याचाही प्रस्ताव आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर हे प्रशिक्षित मनुष्यबळ बांधकाम व्यवसायास उपलब्ध होऊ शकेल. पूर्णतः अकुशल कामगाराचे रूपांतर कुशल कामगारामध्ये होण्यास सर्वसाधारणपणे पाच वर्षांचा कालावधी लागतो. हा कालावधी तीन वर्षांपर्यंत खाली आणण्यासाठीही सध्या विचारविनिमय चालू आहे.

या साऱ्या प्रयत्नांना मूर्त स्वरूप लाभेल त्या वेळी व्यावसायिक प्रशिक्षणाच्या भारतीय व्यवस्थेत एका नवीन 'मॉडेल'चा अवतार अनुभवावयास मिळेल. उद्योगांच्या प्रशिक्षित मनुष्यबळविषयक गरजांची पूर्तता करण्यासाठी उद्योग तसेच उद्योजकांच्या संघटनांनीच पुढाकार घ्यावयाचा, सरकारनेही त्यात सहभागी होत त्या प्रयत्नांना पूरक अशी तंत्रशिक्षणप्रणाली राबवावयाची हा साराच प्रकार आपल्याला नवीन वाटत असला तरी कामगार प्रशिक्षणाचे हे प्रारूप युरोपीय देशांना नवीन नाही. ऑस्ट्रिया, जर्मनी, स्वित्झर्लंड आदी युरोपीय देशांमध्ये गेली सुमारे किमान तीन दशके व्यवहारात असलेले अनेक प्रयोग या संदर्भात अभ्यसनीय आणि तितकेच अनुकरणीयही आहेत.

## प्रशिक्षणाचे युरोपीय 'मॉडेल'

कामगार प्रशिक्षणासाठी उद्योगांनी तसेच त्यांच्या संघटनांनी (असोसिएशन्स) सक्रिय होण्याचा परिपाठ युरोपमध्ये त्या मानाने बराच जुना आहे. या उपक्रमशीलतेचे मूळही युरोपीय देशांमध्ये सुमारे तीन -साडेतीन दशकांपूर्वी साकारलेल्या आर्थिक - औद्योगिक पुनर्रचनेमध्ये दडलेले आहे. आपल्या देशामध्ये १९९१ सालापासून आर्थिक पुनर्रचनेचे जे पर्व सुरू झाले त्यामध्ये मुख्यत्वाने फेररचना झाली ती उद्योगक्षेत्राची. जागतिकीकरणाच्या आजच्या युगात जागतिक स्पर्धेत टिकाव लागावा यासाठी आपल्या उत्पादन खर्चावर मर्यादा ठेवणे हे भारतीय उद्योगांना अपरिहार्य बनले. उत्पादन खर्चात बचत वा कपात करण्याचा त्यातल्या त्यात सोपा व चट्दिशी अंमलात आणता येण्याजोगा मार्ग म्हणजे कामगार वा मनुष्यबळावरील खर्चाला कात्री लावणे. कारण, यंत्रसामग्री अथवा कच्चा माल यांची मात्रा कमीजास्त करण्यापेक्षा उत्पादन प्रक्रियेतील मनुष्यबळाच्या प्रमाणात वध-घट घडवून आणणे, हे त्या मानाने सोपे आणि किफायतशीरही. मनुष्यशक्तीऐवजी तिच्या जागी यंत्रशक्तीची योजना केली की उत्पादकतेमध्ये वाढ घडवून आणणे जसे सुलभ आणि जलद शक्य होते, त्याचप्रमाणे कामगारसंलग्न खर्चांचा बोजाही (उदाहरणार्थ वेतन, भत्ते, कामगारकल्याणविषयक सुविधांवरील खर्च, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी, आजारपणाची रजा व खर्च इत्यादी... इत्यादी) कंपनीच्या खात्यावर चढत नाही हा तसा सोयीस्कर आणि तर्कशुद्ध विचार यामागे असतो. परिणामी, आर्थिक पुनर्रचनेबरोबरच 'जॉबलेस ग्रोथ'चे पर्वही भारतीय अर्थकारणात अवतरले त्यामागील कार्यकारणभाव हा असा होता.

उद्योग क्षेत्राच्या अशा फेररचनेदरम्यान नवीन कामगार भरती झाली नाही इतकेच केवळ नव्हे तर 'गोल्डन हॅन्डशेक'द्वारे अनेकांना नारळ दिला गेला. उद्योगांमध्ये नवनवीन तंत्रज्ञान आल्यामुळे त्या तंत्राशी मैत्र नसलेल्या, त्यातल्या त्यात प्रौढ अशा कामगारांना सन्मान्यरीत्या 'रिटायर' केले गेले. बरे, हे सारे कर्मचारी खचितच 'अकुशल' या वर्गात मोडणारे नाहीत व नव्हते. त्यांच्या ठायी औद्योगिक प्रशिक्षण, कौशल्ये व अनुभव होता मात्र नवीन तंत्रज्ञानाशी त्यांचा परिचय व्हावा यासाठी त्यांचे पुनर्शिक्षण, पुनर्प्रशिक्षण करवणे अगत्याचे होते. उद्योगांच्या फेररचनेदरम्यान औद्योगिक रोजगाराला मुकलेल्या अशा मध्यमवयीन तसेच प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचे श्रमशक्तीत तसेच श्रमांच्या बाजारपेठेत अनुरूप पुनर्प्रशिक्षणाद्वारे पुनर्वसन करणे हे मोठेच आव्हान भारतीय धोरणकर्ते तसेच कामगारविषयक तज्ज्ञांसमोर आहे.

युरोपमध्ये उदारीकरणाचे पर्व अवतरले त्या काळात साकारलेला घटनाक्रम ढोबळमानाने असाच होता. संघटित, मोठ्या उद्योगक्षेत्राच्या फेररचनेदरम्यान 'ले ऑफ' दिला गेलेल्या कामगारांचा तसेच या फेररचनेदरम्यान भागधेय पालटल्याने व्यवसायातून हद्दपार झालेल्या लघुउद्योगांमधील कामगारांचा श्रमदलातील पुनर्प्रवेश सुकर व्हावा यासाठी युरोपातील उद्योगांनी, उद्योजकांनी आणि उद्योजकांच्या संघटनांनीच पुढाकार घेतला. कामगारांच्या प्रशिक्षणाचे, पुनर्प्रशिक्षणाचे उपक्रम राबविले. उद्योगांच्या प्रशिक्षित मनुष्यबळविषयक गरजा, त्यांतील बदल, नव्याने येऊ घातलेले उत्पादन तंत्र व नूतन यंत्रसामग्री, आधुनिक उत्पादन प्रणाली यांचे उचित भान ठेवणारी प्रशिक्षण व्यवस्था आणि अभ्यासक्रम तयार केले. या अभ्यासक्रमांमध्ये काळानुरूप बदल घडून येतील याचीही घडी बसविली. औद्योगिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि उद्योग क्षेत्र यांच्यात सातत्यशील संवाद प्रस्थापित होईल अशी यंत्रणा उभारली व राबविली. संघटित उद्योग, सरकार आणि तंत्रशिक्षण पुरविणाऱ्या संस्था यांचा सक्रिय सहभाग असणारे एक अनुकरणीय असे प्रारूप त्यातून जन्माला आले. जर्मनी, ऑस्ट्रिया, ब्रिटन, स्वित्झर्लंड यांसारख्या देशांमध्ये हे प्रारूप गेली सुमारे चार दशके व्यवहारात नांदते आहे. काळाच्या ओघात त्यास अतिशय सुसंघटित आणि सुविहित असे स्वरूप प्राप्त झाले आहे. औद्योगिक कामगार वा व्यावसायिक प्रशिक्षणविषयक या प्रारुपाचे विविध पैलू चिंतनीय आणि अनुसरणीय आहेत.

स्वित्झर्लंडसारख्या युरोपीय देशामध्ये उद्योगांच्या विविध अंगोपांगांत (उदाहरणार्थ हस्तकला, संघटित वस्तुनिर्माण उद्योग, सेवा उद्योग) त्या त्या उद्योगशाखेतील उद्योगांच्या संघटना सक्रिय असतात. अगदी लहान व स्थानिक स्वरूपाच्या संघटनांचा अपवाद वगळता अन्य संघटना या प्रांतिक अथवा विभागीय तसेच राष्ट्रीय स्तरावरही कार्यरत असतात. संघटित तसेच मोठ्या उद्योगांची व्यासपीठे म्हणून सक्रिय असणाऱ्या बव्हंशी सुसज्ज संघटनांची कायमस्वरूपी कार्यालयीन तसेच प्रशासकीय यंत्रणा सिद्ध असते. व्यावसायिक अथवा औद्योगिक प्रशिक्षण हा बहुतेक सर्वच संघटनांच्या नित्याच्या कार्यक्रमांचा व उपक्रमांचा एक अविभाज्य घटक असतो. त्यासाठी अशा संघटनांमध्ये एका स्वतंत्र समितीची अथवा उपसमितीची योजना केलेली आढळते. अनेक मोठ्या संघटनांमध्ये व्यावसायिक अथवा औद्योगिक प्रशिक्षणाच्या क्षेत्रातील एक तज्ज्ञच नियुक्त केलेला असतो. उद्योग अथवा उद्योजकांच्या अनेक संघटनांनी आपल्या सदस्य कंपन्यांमधील मनुष्यबळास औद्योगिक तसेच तांत्रिक प्रशिक्षण देणारी प्रशिक्षण

केंद्रेच स्थापन केलेली आढळतात. संघटनेच्या सदस्य कारखान्यांमधील कामगारांच्या प्रशिक्षणविषयक गरजा ध्यानात घेऊन या प्रशिक्षण केंद्रांमधून अल्पमुदतीचे, अल्पावधीचे विविध प्रशिक्षण कार्यक्रम नित्याने राबविण्यात येतात वा आयोजित केले जातात.

व्यावसायिक, औद्योगिक तसेच धंदेशिक्षणाचे विविधांगी अभ्यासक्रम (कोर्सेस) तयार करून राबविण्यासंदर्भात युरोपातील अशा उद्योजक वा उद्योग संघटनांची भूमिका केवळ आगळीवेगळीच नाही तर ती अतिशय केंद्रवर्ती स्वरूपाची अशी आहे. औद्योगिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था-संघटनांमधून कोणते अभ्यासक्रम नेमावयाचे याचा संपूर्ण तपशील व त्या अभ्यासक्रमांचे रंगरूप या संघटनांनीच तयार करून मध्यवर्ती सरकारच्या तंत्रशिक्षणविषयक विभागास मंजुरीसाठी सादर करावयाचे असते. संघटनांच्या रचनेचा व कामकाजाचा एक अविभाज्य घटक असलेल्या कायमस्वरूपी प्रशिक्षण उपसमितीने अथवा असा एखादा अभ्यासक्रम तयार करण्यासाठीच केवळ त्या संघटनेने नियुक्त केलेल्या हंगामी प्रशिक्षण समितीने या अभ्यासक्रमाचा संपूर्ण सांगाडा निश्चित करणे अपेक्षित असते. या अभ्यासक्रमास तेथील तांत्रिक परिभाषेत 'जॉब प्रोफाइल' असे संबोधले जाते. हे 'जॉब प्रोफाइल' मंजूर करणे वा न करणे हे पूर्णतया मध्यवर्ती सरकारच्या संबंधित विभागातर्फे त्या 'जॉब प्रोफाइल'च्या केल्या जाणाऱ्या चिकित्सेवर निर्भर असते. प्रसंगी एखादे 'जॉब प्रोफाइल' काही विशिष्ट कालावधीपुरतेच नेमण्याचा निर्णयही संबंधित विभाग घेऊ शकतो. मात्र, सरकारी मान्यतेची मोहोर उमटल्यानंतरच 'सरकारमान्य जॉब प्रोफाइल' म्हणून ते प्रकाशित केले जाते. प्रशिक्षणार्थींच्या ठायी कोणती कौशल्ये त्या अभ्यासक्रमाद्वारे तयार होणे अपेक्षित आहे त्या कौशल्यांचा तपशील, कोणकोणत्या बाबी नेमक्या शिकवावयाच्या त्याबाबतचे सविस्तर कथन, प्रशिक्षणाचा कालावधी आणि शेवटी त्या अभ्यासक्रमाची परीक्षा कशी घ्यावयाची याबाबतच्या सूचना अशा विविध बाबींचे विवरण त्या 'जॉब प्रोफाइल'मध्ये असणे अपेक्षित असते. अशा मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांद्वारेच व्यावसायिक वा धंदेशिक्षण घेणे उमेदवार प्रशिक्षणार्थींना शक्य होते. औद्योगिक वा धंदेशिक्षणाच्या युरोपीय व्यवस्थेत उद्योजक वा उद्योगसंघटनांची भूमिका किती कळीची आहे, याचा अंदाज या विवेचनावरून यावा.

अभ्यासक्रमांचे अंतरंग तयार करून त्यावर सरकारी मान्यतेचा शिक्का उमटवून घेण्यापुरताच उद्योगसंघटनांचा 'रोल' मर्यादित राहत नाही. मध्यवर्ती सरकारच्या व्यावसायिक शिक्षणविषयक विभागाने मंजुरी दिलेल्या अभ्यासक्रमांची कार्यवाही

करण्यासाठी 'लीड एजन्सी' म्हणूनही उद्योगांच्या संघटना कार्यभार स्वीकारतात. या संदर्भात 'लीड एजन्सी' या नात्याने उद्योगांच्या संघटनांकडे असणाऱ्या जबाबदाऱ्या म्हणजे - (१) कौशल्य शिक्षणाच्या अभ्यासक्रमातील जो भाग प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी घ्यावयाच्या प्रयोगशिक्षण वा कार्यानुभवाच्या स्वरूपाचा असेल त्या भागाच्या अध्यापनासंदर्भात मार्गदर्शक सूचना व तत्वे तयार करणे (२) प्रशिक्षणार्थींच्या चाचण्या तसेच अंतिम परीक्षेसाठी एक उपसमिती तयार करणे, आणि (३) उद्योगांच्या प्रशिक्षित मनुष्यबळविषयक गरजांशी सुसंवादी असेल अशा प्रकारे एकदा तयार केलेले 'जॉब प्रोफाइल' बदलत्या औद्योगिक पर्यावरणानुसार प्रवाही राहील याची काळजी घेत त्या अभ्यासक्रमांचे वेळोवेळी अद्यावतीकरण होत राहावे, यासाठी कार्यप्रणाली तयार करणे. किंबहुना, अशी एखादी उद्योग संघटना 'लीड एजन्सी' या नात्याने भागीदार म्हणून एखाद्या प्रशिक्षण उपक्रमात सहभागी असल्याखेरीज, प्रत्यक्ष नोकरी अथवा कामाच्या जागी आयोजित करावयाच्या अनुभवाधारित प्रशिक्षणाचा एखादा अभ्यासक्रम राबविणे हे मध्यवर्ती सरकारच्या औद्योगिक प्रशिक्षणविषयक विभागास शक्यच होत नाही. कामगार प्रशिक्षणाच्यासंदर्भात, अशा प्रत्यक्षानुभवाधारित प्रशिक्षणाचा अंश हा तुलनेने अधिक महत्त्वाचा ठरत असल्याने अशा प्रत्यक्षानुभवाधारित कार्यशिक्षणाच्या आखणी-अंमलबजावणीत उद्योग संघटनांचा सक्रिय सहभाग कळीचा ठरतो.

एखाद्या कारखान्यात प्रत्यक्ष काम करीत असताना प्रशिक्षणार्थीने कार्यानुभावाच्या माध्यमातून घ्यावयाच्या धंदेशिक्षणाचे स्वरूप हे बहुतांशी 'ऑन द जॉब ट्रेनिंग'च्या स्वरूपाचे असते. बरेचदा, असे प्रशिक्षण घेणारा प्रशिक्षणार्थी हा त्या कारखाना वा कंपनीत शिकाऊ उमेदवार म्हणून नियुक्तही झालेला असतो. साहजिकच, अशा वेळी त्या प्रशिक्षणार्थीस दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचे अंतरंग हे बव्हंशी त्या विविक्षित कंपनीच्या उत्पादनविषयक गरजांनीच निर्धारित केलेले असते. सर्वसाधारण प्रशिक्षण संस्थांमधून राबविला जाणारा प्रमाणित अभ्यासक्रम अशा वेळी अप्रस्तुत ठरतो. मात्र, अशा 'ऑन द जॉब ट्रेनिंग' संदर्भात आवश्यक ठरणारा प्रशिक्षणाचा क्रम, प्रशिक्षणाबाबतची मार्गदर्शक तत्वे यांचा अंतर्भाव असलेला प्रारूप अभ्यासक्रमाचा जो ढाचा संबंधित उद्योग संघटना तयार करते तो अन्य कंपन्यांनाही दिशादर्शक ठरतो. अशा 'ऑन द जॉब ट्रेनिंग'जोडीनेच ठराविक अभ्यासक्रमाच्या आधारे वर्गातील तासिकांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या अध्यापन-प्रशिक्षणाचाही अंतर्भाव व्यावसायिक शिक्षणात असतो. मात्र, यात मध्यवर्ती सरकारनियुक्त अभ्यासक्रम समितीची भूमिका मुख्य असते.

काही कंपन्या प्रशिक्षणार्थींची निवड करून प्रथम त्यांना शिकाऊ उमेदवार म्हणून कामावर दाखल करून घेतात आणि मग त्यांच्यासाठी आपल्या गरजांनुसार प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबवितात. प्रशिक्षणाच्या या 'मॉडेल'मध्येही कंपन्यांना पूरक वा साहाय्यक अशी भूमिका युरोपातील उद्योग संघटनांनी स्वतःसाठी तयार केलेली दिसते. प्रशिक्षणार्थी निवड प्रक्रियेत आपल्या सदस्य कारखाने वा उद्योगांना मदत करण्याच्या हेतूने अनेक उद्योग संघटनांनी अनुरूप अशा प्रवेश परीक्षा तयार केल्या आहेत. ज्या 'ट्रेड'साठी तो वा ती प्रशिक्षणार्थी निवडावयाची त्या त्या विविक्षित 'ट्रेड'साठी अशा वेगवेगळ्या प्रवेश परीक्षा 'डिझाइन' करण्यात उद्योग संघटना पुढाकार घेतात. काही उद्योग संघटना अशा प्रवेश परीक्षांचे आयोजन विभागीय पातळीवर करण्यात सक्रिय असतात तर, काही संघटना या केवळ आपल्या सदस्य कंपन्यांना अशा प्रवेश परीक्षा तयार करून देण्याबरोबरच त्या परीक्षांदरम्यान आवश्यक असणारी उपकरणे, हत्यारे, साधने उपलब्धही करून देतात.

'ऑन द जॉब ट्रेनिंग'संदर्भात आवश्यक ठरणारा प्रशिक्षणाचा क्रम, प्रशिक्षणाबाबतची मार्गदर्शक तत्वे यांबाबतचा जो ढाचा संबंधित उद्योग संघटना तयार करते त्याचा आधार घेऊन वेगवेगळ्या कंपन्या आपापल्या गरजांशी सुसंवादी असे 'ऑन द जॉब ट्रेनिंग'चे उपक्रम तयार करतात व राबवितात. त्यातही पुन्हा मोठ्या आणि संघटित उद्योगांकडे त्यांची स्वतःची अशी सुसज्ज प्रशिक्षण केंद्रे वा विभाग असतात. अनेक ठिकाणी असेही अनुभवास येते की, एखाद्या विविक्षित उद्योगात कार्यरत असलेल्या त्या उद्योगाच्या वा उद्योजकांच्या संघटनेनेच आपले एक स्वायत्त प्रशिक्षण केंद्र वा प्रशिक्षण सुविधा तयार केलेली असते. सदस्य उद्योगांमध्ये वापरले गेलेले तंत्रज्ञान, त्यात वेळोवेळी होत असलेले बदल, सदस्य उद्योगांकडील मनुष्यबळ, त्या मनुष्यबळाच्या अंगभूत क्षमता व कौशल्ये, सदस्य कारखान्यांच्या प्रशिक्षित मनुष्यबळविषयक गरजा यांसारख्या विविध बाबींचे अनुसंधान राखत त्या त्या उद्योग संघटना वेळोवेळी अनुरूप असे प्रशिक्षण कार्यक्रम त्या प्रशिक्षण केंद्रांद्वारे आखत-राबवत असतात. अशा प्रशिक्षण केंद्रांचे स्वरूप व त्यांच्या कार्याचा परीघ हा अगदी स्थानिक परिसरापुरता मर्यादित असण्यापासून ते थेट राष्ट्रीय स्तरापर्यंतही व्यापक असतो. या प्रशिक्षण केंद्रांमधून आयोजित केल्या जाणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा खर्च हा सदस्य कारखाने जसा उचलतात त्याचप्रमाणे सरकारही त्यास अनुदान देते. आपल्या देशातील उद्योग संघटना या युरोपीय 'मॉडेल'पासून काही स्फूर्ती घेतील का ? ✿✿

## जिकडे-तिकडे

# अमेरिकी महाविद्यालयीन शिक्षणविश्व

अमेरिकेत महाविद्यालयीन शिक्षण बरेच लोकप्रिय असावे, असे दिसते. आपल्या देशात उच्च माध्यमिक परीक्षेनंतर महाविद्यालयीन शिक्षणाची वाट चोखाळणाऱ्या इच्छुकांना पदवी पदरात पाडून घेण्यासाठी तीन वर्षे वेचावी लागतात. अमेरिकी महाविद्यालयीन शिक्षणाच्या प्रचलित पठडीप्रमाणे पदवीधारक बनण्यासाठी तिथे चार वर्षे लागतात. महाविद्यालयीन शिक्षण अमेरिकेत बरेच लोकप्रिय असावे, असा कयास बांधण्यास पुरेसा आधार आहे कारण, अमेरिकी प्रौढांपैकी जवळपास निम्मे तरी महाविद्यालयीन शिक्षणाच्या मांडवाखालून केव्हा ना केव्हा तरी गेलेले आहेत. मग भले त्यांनी ते शिक्षण पूर्ण न का करीना !

महाविद्यालयीन शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, हे अमेरिकेचे एक ईप्सितच आहे म्हणा ना. प्रत्येकाने कॉलेजमध्ये गेलेच पाहिजे, अशी जणू तेथे धारणा आहे. परिणामी, महाविद्यालयात दाखल होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला कुठल्या ना कुठल्या कॉलेजमध्ये प्रवेश हा मिळालाच पाहिजे, या पद्धतीने शिक्षण व्यवस्थेची रचना तिथे आहे. मात्र त्याच वेळी महाविद्यालयातील हा प्रवेश शुद्ध गुणवत्तेच्या व पात्रतेच्या निकषांवरच व्हावा, अशीही मानसिकता तेथे नांदते. परंतु, म्हणून विद्यार्थ्यांच्या निवडीची प्रक्रिया ही अतिशय कार्यक्षम असते वा आहे असेही दिसत नाही. लक्ष्मीचा वरदहस्त लाभलेले भाग्यवंत सरस्वतीच्या उपासनेसाठी तुलनेने चांगल्या गुणवान महाविद्यालयांत प्रवेश मिळवितात. प्रवेशासाठी अर्ज दाखल केलेल्या पाच हजार इच्छुकांपैकी १५०० जणांना हार्वर्ड महाविद्यालयाने १९६० साली प्रवेश दिला होता. गेल्या वर्षी त्याच महाविद्यालयाने २३ हजार अर्जदारांपैकी दोन हजारांना प्रवेश दिला. मात्र, प्रत्येकच पात्र विद्यार्थ्यास कोणत्या ना कोणत्या अभ्यासक्रमास प्रवेश मिळतोच. उच्च शिक्षणाची सुविधा पुरविणाऱ्या जवळपास चार हजार संस्था-महाविद्यालयांमधून चालू शैक्षणिक वर्षाच्या आरंभी उभ्या अमेरिकेत सुमारे पावणेदोन कोटी विद्यार्थी विद्यार्जन करीत होते. परंतु, अमेरिकेतील कोणत्याही ५० महाविद्यालयांची नावे सांग, असे एखाद्या विद्यार्थ्यास सांगितले आणि त्याच्याकडून उत्तर मिळाले तर शपथ !

अमेरिकेतील महाविद्यालयीन शिक्षण चांगले भरपूर महागडे आहे. चांगले घसघशीत शिक्षण शुल्क आकारणारी महाविद्यालये तसेच माफक वा तुलनेने अल्प शुल्क आकारणारी महाविद्यालये अशा सर्वांचा विचार करून चार वर्षे कालावधीच्या महाविद्यालयीन पदवीशिक्षणाचे सरासरी शैक्षणिक शुल्क काढले तर ते चांगले २३ हजार डॉलरपेक्षा अधिक भरते.

महाविद्यालयात नाव दाखल करणारे सगळेच विद्यार्थी चार वर्षांचे हे पदवीशिक्षण सरसहा बिनबोभाट पूर्ण करतात असेही नाही. महाविद्यालयाच्या प्रांगणात दाखल झालेल्यांपैकी जवळपास ५० टक्के विद्यार्थीगण कधीही पदवीधारक बनतच नाहीत. पदवीपरीक्षेसाठी तयारी करणारे हे विद्यार्थी पदवीसाठी प्रधान अभ्यासविषय म्हणून कोणत्या विषयांची निवड करतात, हे पाहणेदेखील रंजक ठरते. व्यवसाय व्यवस्थापन वा उद्योग-व्यवसायाशी संलग्न विषयांना (बिझनेस) सर्वाधिक - म्हणजे २३ टक्के विद्यार्थ्यांची - पसंती असल्याचे अनुभवास येते. त्या नंतर क्रम लागतो तो शिक्षणाशी संलग्न अभ्यासक्रमांचा. शिक्षणाखालोखाल येते आरोग्य. आरोग्य वा वैद्यकीय शिक्षणाशी संबंधित अभ्यासक्रमास पसंती देणाऱ्यांचे एकूणांतील प्रमाण आहे पाच टक्के. इंग्रजीसारख्या भाषाविषयात पदवी धारण करू इच्छिणाऱ्यांचे प्रमाण आहे चार टक्के इतके. तर, इतिहास हा विषय घेऊन पदवीधारक बनू इच्छिणाऱ्यांचे एकंदर विद्यार्थ्यांमधील प्रमाण आहे सर्वांत कमी, म्हणजे अवघे दोन टक्के ! विविध भाषा, परकीय भाषाशिक्षण, साहित्य यांसारख्या विषयांत प्राविण्य मिळवून पदवीधारक बनणाऱ्यांपेक्षा उद्यानविद्या, करमणूक व मनोरंजन, तंदुरुस्ती यांसारख्या अभ्यासविषयांत पदवी प्राप्त करून घेणाऱ्यांचे प्रमाण किती तरी अधिक आहे. अमेरिकी शिक्षणव्यवस्थेमधून आजमितीस 'लिबरल् आर्ट्स्' हे अभिधान आता जणू अस्तंगतच झालेले आहे. 'इंग्रजी भाषा' हा प्रधान विषय घेऊन पदवीपरीक्षेस बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने शेक्सपीअर वाचला आहे किंवा नाही, या बाबत आजकाल फारशी तमा बाळगताना अमेरिकेत कोणी दिसत नाही. कोणता विषय फारसे विद्यार्थी निवडताना दिसत नाहीत, वा आपण जो विषय पदवीसाठी निवडलेला आहे तो अन्य कोणी विद्यार्थी तर निवडत नाही ना, याचीच शहानिशा करण्याच्या भ्रांतीत बहुतेक पडलेले दिसतात.

गुणवत्ता आणि पात्रता यांबाबत असणाऱ्या एकंदरच कटाक्षापायी अमेरिकेतील महाविद्यालयीन शिक्षण हे तसे दुष्करच आहे. विद्यार्थ्यांच्या श्रेणी वाढवून देण्याच्या बाबतीत, त्या चढाओढीत महाविद्यालये विख्यात आहेतच. तरीही अंतिम स्तरावर

आणि गुण वा श्रेणींचे अंतिम विश्लेषण करीत असताना त्यांतील अत्यल्प फरकही (विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने) महत्त्वाचे ठरतात. गुणवत्तेबाबतचा आग्रह हा विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण करण्यास कारणभूत ठरतो.

महाविद्यालयीन शिक्षणाच्या प्रवेशपातळीवर सर्वांना संधी उपलब्ध करून देण्याइतपत अमेरिकी महाविद्यालयीन शिक्षणव्यवस्था निश्चितच लोकतंत्रप्रधान आहे. मात्र, असे असले तरीही कोणत्याही विद्याशाखेत प्रत्यक्ष अभ्यासक्रमांस मिळणारा प्रवेश हा केवळ गुणवत्तेच्या निकषावरच दिला जाईल, याबाबत कटाक्ष राखण्याइतपत ती दक्षही आहे. त्यामुळे आपली गुणवत्ता, क्षमता ही प्रत्येक शैक्षणिक स्तरावर सातत्याने सिद्ध करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर अहोरात्र असते. या बाबतीत मात्र विद्यार्थ्याच्या मदतीला कोणीही धावून येत नाही. आपला मार्ग प्रत्येकालाच आत्मनिर्भरपणे चोखाळवयास लागतो. महाविद्यालयीन जीवनादरम्यान विद्यार्थी जे जे काही करत असतो ती त्याची एक प्रकारची चाचणीच असते. जणू निरंतर चालणारी परीक्षा ! 'अंतिम परीक्षा' असा काही प्रकारच कोणत्याही टप्प्यावर नाही. महाविद्यालयीन शिक्षणाच्या आरंभीच्या पर्वापासूनच हा परिपाठ विद्यार्थ्याच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक बनून जातो. हातून चुका घडण्याची भीती मनात असेल तर तुम्ही जीवनात काहीच शिकू शकणार नाही, हेच तत्व जणू यातून विद्यार्थ्याच्या मनावर बिंबत जाते.

विशाल विश्वाला सामोरे जाण्याचा आत्मविश्वास विद्यार्थ्याच्या मनात जागविणे हाच तर महाविद्यालयीन शिक्षणाचा गाभा आहे. मात्र, ज्यांच्या ठायीच्या (अतिरिक्त) आत्मविश्वासाचे रूपांतर अहंकारात झालेले आहे अशांची झळ जगाला पोहोचू नये, यासाठी काय करावयाचे ही एक नवीनच समस्या आता उद्भवते आहे. कारण, या शिक्षणाचा 'प्रॉडक्ट' असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये लीनता नामक गुण अलीकडे औषधालाही सापडत नाही !

## एक विनंती...

वाचकांचा प्रतिसाद हा कोणत्याही लेखन-संपादन व्यवहारातील जितका आनंदाचा तितकाच प्रबोधक भाग असतो. 'अर्थबोधपत्रिके'च्या अंतरंगासंदर्भात समाधान व्यक्त करणारी वाचकांची पत्रे ही उत्साह वाढविणारी अशीच असतात. परंतु त्याच्याच जोडीने, पत्रिकेकडून असणाऱ्या अपेक्षाही शब्दबद्ध करून पत्ररूपाने मांडल्यास अधिक संतोष होईल. -संपादक

# प्रमुख संदर्भ

'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकामधील लेखांतील मजकुरासाठी आधार म्हणून वापरलेले संदर्भसाहित्य पुढीलप्रमाणे : (1) Velvet Revolution in Iran ? - Martim Beck Matustik -www.logos journal.com (2) www.iran-press-service.com (3) Academic Freedom in Iran and America-Robert Jensen- www.third coastactivist.org (4) Nature/Volume 447, 21 June 2007 (5) The Oxford encyclopedia of the Modern Islamic World - Volume 2 (6) Tribune Media Services (7) www.eurasianet.org (8) news.bbc.co.uk (9) www.opendemocracy.net (10) World Drug Report -2007, United Nations Office on Drugs and Crime - (UNODC), Executive Summary, Report published on 26 June 2007 (11)The Economist-30 June 2007 (12) www.geographical.co.uk (13) New Scientist 2 September 2006 (14) The Economist - 21 July 2007 (15) India Shining at bottom of pyramid, The Economic Times, Mumbai, 12 June 2007, pp. 1, 7. (16) The NEW YORKER (17) हा तेल नावाचा इतिहास आहे, गिरीश कुबेर, राजहंस प्रकाशन, २००६, पुणे.

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१ जून २००६ पासून)**

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १०० / - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८०/ - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

(1)The Grassroots of Democracy : Field Studies of Indian Elections , Srinivas M.N and Shah A.M., Permanent Black, New Delhi -2007, Price Rs.695/-

(2)Waterscapes - The Cultural Politics of Natural Resource, Baviskar Amita (Ed.), Permanent Black, Raniket -2007, Uttaranchal, Price 695/-

(3) Indian Cities in Transition, Shaw Annapurna (Ed.), Orient Longman, Pvt. Ltd. Hyderabad -2007, Price 850/-

(4) The City in Action - Bombay : Struggles for Power, Masselos Jim, Oxford University Press, New Delhi -2007, Price Rs. 695/-

(5) Gandhi as Disciple and Mentor, Weber Thomas, Cambridge University Press India Pvt. Ltd., New Delhi -2007, Price 295/-

(6)India's Long-Term Growth Experience - Lessons and Prospects, Ahmed Sadiq, Sage Publications India Pvt Ltd, New Delhi -2007, Price 475/-

(7)Marxism and Class Analysis, Beteille Andre, Oxford University Press, New Delhi -2007, Price Rs. 625/-

(8) Institutions and Markets in India's Development - Essays for K.N. Raj, Vaidyanathan A., Krishna K.L.(Ed.), Oxford University Press, New Delhi -2007, Price Rs. 595/-

(9) The New Indian Industry : Structure and Key Players, Srinivasan R. (Ed.), Macmillan India Ltd., New Delhi, 2005, Price Rs. 525/-

(10) Creating a New Consensus on Population - The International Conference on Population and Development, Singh Jyoti Shankar, Earthscan Publications Ltd., London - 2006, Price Rs. 395/-

(11) Census and You - Basic Results from Census 2001-Catalougue and Services - Series : India, Office of the Registrar General and Census Commissioner, India, Government of India, New Delhi -2005, Price Rs. 77/-

(12) Bharat's Income Tax Act, The Taxation Law (Amended) Act - 2006 and The Finance Act - 2007, Puliani Mahesh (Ed.), Bharat Law House Pvt. Ltd, New Delhi - 2007, Price Rs. 480/-

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •सुहास पळशीकर
•रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**